गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २०२
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

चौक विभागात ठाकरे गटाला गळती सुरूच/३
खोपोलीत मंगळसूत्र खेचून पळणाऱ्या चोराला पकडले/५
आजपासून भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया पहिली कसोटी/८

## राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २७ फेब्रुवारीपासून



**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २७ फेब्रुवारी ते २५ मार्च या कालावधीत मुंबईत होणार आहे. या अधिवेशनात ९ मार्च रोजी अर्थसंकल्प सादर केला जाईल. विधानसभा आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे झाली. या बैठकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विरोधी पक्षनेते अजित पवार, दूरदृश्यप्रणालीद्वारे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

## ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा सर्वोच्च सन्मान

# महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली भेट



**अलिबाग : प्रतिनिधी**

**मानवता हाच खरा धर्म मानणारे ज्येष्ठ निरूपणकार, पद्मश्री डॉ. दत्तात्रेय तथा आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अध्यात्म, समाजप्रबोधन, सामाजिक कार्य, अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत राज्य सरकारकडून बुधवारी (दि. ८) या सर्वोच्च पुरस्काराची घोषणा करण्यात आली.**



ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना वर्ष २०२२चा राज्य सरकारचा सर्वोच्च महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. निवड समितीने केलेल्या शिफारशीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी शिक्कामोर्तब केले. रेवदंडा येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आप्पासाहेबांची भेटही घेतली व शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, भरत गोगावले, महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, रायगड भूषण डॉ. सचिन धर्माधिकारी, उमेश धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी तसेच कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. अलीकडच्या काळात प्रतिष्ठानने सर्वाधिक प्रमाणात वृक्षारोपण केले. याशिवाय वृक्षसंवर्धन, स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिराचे आयोजनही नियमितरीत्या करण्यात येते. गणेशोत्सव व नवरात्रोत्सवानंतर निर्माल्यातून खतनिर्मिती करून एक पर्यावरणपूरक संदेशही त्यांनी समाजाला दिला. अशा या कार्याची सुरुवात त्यांचे वडील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी १९४३ सालापासून केली होती आणि आज तेच कार्य तेवढ्याच जोमाने व तत्परतेने डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी जगभर पोहचवित असून माणसे जोडत आहेत.

### श्रीसदस्य आनंदले

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी गेली ३० वर्षे निरूपण करीत असून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, बालसंस्कार बैठका सुरू केल्या आणि आदिवासी वाडी, वस्त्यांवर व्यसनमुक्तीचेही कार्य केले. आप्पासाहेबांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण रेवदंडा येथेच झाले. बालपणापासून त्यांना भजन, कीर्तन, आध्यात्मिक वाचनाची आवड होती. तळागाळातील प्रत्येक मनुष्यासाठी, समाजाच्या सेवेसाठी आप्पासाहेबांनी आपले आयुष्य वेचले आहे. ते स्वच्छतादूत म्हणूनही ओळखले जातात. त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाल्याने श्रीसदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाल्याने या पुरस्काराची उंची वाढली आहे. त्यांचे कार्य समाजजीवनात प्रत्येकाच्या मनापर्यंत पोहचले आहे. अनेक उद्ध्वस्त होणारी कुटुंब त्यांची प्रेरणा, मार्गदर्शनामुळे वाचली आहेत. पुरस्काराबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि शुभेच्छाही देतो.**

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**यापूर्वी माझे वडील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांना राज्य शासनाने महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविले होते. आता तोच पुरस्कार मला जाहीर झाला याचा आनंद आहे. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारीदेखील वाढली आहे. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आता अधिक व व्यापक काम केले जाईल.**

**-डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, ज्येष्ठ निरूपणकार**

# महाड हादरले!

### कंपनीत भीषण आगीनंतर स्फोट; १३ जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी बुधवारी (दि. ८) स्फोटाने हादरली. येथील मल्लक कंपनीत भीषण आग लागून स्फोट झाला. यामध्ये कंपनीतील तसेच शेजारील कंपन्यांमधील असे एकूण १३ जण जखमी झाले आहेत. या स्फोटाची तीव्रता इतकी होती की जवळपास आठ किमी परिसराला हादरे बसले आणि इमारतीचे व लोखंडाचे तुकडे दोन किमी अंतरावर जाऊन पडले.




महाड औद्योगिक वसाहतीमध्ये पिग्मेन्ट रंगाची निर्मिती करणाऱ्या कारखान्यात बुधवारी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीने कंपनीच्या एका प्लांटला क्षणातच विळखा घातला. आग लागल्याचे समजताच कामगारांनी आगीवर नियंत्रण आणण्याचे आटोकाट प्रयत्न केले, मात्र त्याचवेळेस प्लांटमधील एका रिॲक्टरने पेट घेतल्याने स्फोट झाला. या स्फोटामुळे परिसर हादरला. स्फोटाच्या दणक्याने कंपनीच्या प्लांटची इमारत पूर्णपणे ढासळली. या ढासळलेल्या इमारतीचे तुकडे परिसरात जाऊन पडले. कंपनी परिसरात असलेल्या प्रीव्ही, श्रीहरी आणि सिद्धार्थ या कंपन्यांच्या खिडक्या मोडून पडल्या, तर रिॲक्टरसह अन्य लोखंडी तुकडे सुमारे दोन किमी अंतरापर्यंत उडाले. स्फोट झाल्याने आग आणखी भडकली. कंपनीच्या दोन प्लांटला आगीने विळखा दिला. **(पान २ वर..)**

## ईडीचे आभार माना!
### पंतप्रधान मोदींचा विरोधकांना टोला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ज्यांची सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीकडून चौकशी झाली त्यांनी ईडीचे आभार मानले पाहिजेत, कारण ईडी चौकशीच्या फेऱ्यात अडकल्यामुळेच विरोधक एका व्यासपीठावर आले. जे काम जनता करू शकली नाही ते काम ईडीने केले आहे, असा टोला पंतप्रधान मोदी यांनी लगावला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देताना पंतप्रधान मोदींनी बुधवारी (दि. ८) काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. **(पान २ वर..)**






# दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्यासाठी समिती गठीत

## मंत्री चंद्रकांत पाटील यांचे मंत्रालयातील बैठकीत निर्देश



**मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यात दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. अमरावती जिल्ह्यात दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी समिती गठीत करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. दिव्यांग बांधवांच्या शैक्षणिक सोयीसाठी राज्यात स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठ होणे गरजेचे असल्याचे पाटील म्हणाले.

राज्यात स्वतंत्र दिव्यांग विभाग स्थापन करण्याचा निर्णय शासनाने यापुर्वीच घेतला आहे. दिव्यांग बांधवांच्या शैक्षणिक सोयीसाठी राज्यात स्वतंत्र दिव्यांग विद्यापीठ होणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासन सकारात्मक असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. या विद्यापीठाच्या कामाला गती यावी, यासाठी समिती गठीत करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले. यावेळी माजी राज्यमंत्री आमदार बच्चू कडू ,उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव अजित बाविस्कर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर उपस्थित होते.

गाव-खेड्यांमधील दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ त्वरित मिळण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये दिव्यांग भवन तथा जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली होती. सर्व जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि स्थानिक आमदार निधी यांच्या अर्थसहाय्याने हे दिव्यांग भवन बांधण्यात येणार आहे. त्याचा सर्वंकष आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली होती.

### स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयाची स्थापना

**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डिसेंबर २०२२ मध्येच स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्यात आल्याची घोषणा केली आहे. स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयात २ हजार ६३ पदे भरली जाणार आहेत. तसेच यासाठी १ हजार १४३ कोटी रुपये राज्य सरकारने दिले असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली होती. या स्वतंत्र मंत्रालयासाठी २ हजार ६३ पदे यासाठी निर्माण होतील, तसेच सेक्रेटरी दर्जाचा अधिकारी यासाठी असेल. तुमच्या कल्याणासाठी जे जे आवश्यक आहे, ते सगळं हे मंत्रालय करेल. कुठलंही धोरण ठरवताना आता दिव्यांगांच मत सुद्धा जाणून घेतले जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते.**

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आज रक्तदान शिबिर

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बाळासाहेब ठाकरे शिवसेना निजामपूर विभागाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र निजामपूर येथे करण्यात आले आहे

या शिबिरात रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन माणगांव बाळासाहेबांची शिवसेना माणगांव उपतालुका प्रमुख नितीन पवार उपजिल्हा प्रमुख युवा सेना अविनाश नलावडे, माणगांव तालुका प्रमुख युवा सेना राजेश कदम, गणेश समेळ, सुधीर पवार,ज्ञानेश्वर उत्तेकर, संतोष पोळेकर, पवन कोळवणकर, नितीन बडे, स्वप्निल शिर्के, प्रकाश जंगम, गणेश पवार, काशिनाथ देवगरे, संदीप लाड, प्रमोद खेतम तसेच निजामपूर विभागातील शिवसैनिक यांनी केले आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या रक्तदात्यांनी रामदास सावंत व एकनाथ उत्तेकर यांच्याकडे सपर्क करण्यात यावा.

## मी छोटी नव्हे, मोठी आव्हाने स्वीकारतो!

### वरळीत मुख्यमंत्र्यांचे आदित्य ठाकरेंना प्रत्युत्तर

**मुंबई : वृत्तसंस्था**

''मी छोटी नव्हे, मोठी आव्हाने स्वीकारून स्वत:ला सिद्ध करून दाखवतो. सहा महिन्यांपूर्वीच मी मोठे आव्हान स्वीकारले आणि जनतेच्या मनातले सरकार स्थापन केले'', असे प्रत्युत्तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांना दिले.

सागरी किनारा मार्गातर्गत वरळी येथे पुलाच्या खांबांमधील अंतर वाढवून देण्याची मागणी शिंदे-फडणवीस सरकारने मान्य केल्याने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यासाठी वरळी कोळीवाडा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमाला फडणवीस हे अनुपस्थित होते.

''निवडणूक आली म्हणून आम्ही घोषणा करत नाही, तर लोकांची कामे करण्यासाठी सत्तेवर आलो आहोत. त्याप्रमाणे कामे सुरू आहेत'', असे त्यांनी नमूद केले. सत्तेची हवा डोक्यात गेलेल्यांना लोकांच्या प्रश्नांची जाणीव नसते, असा टोलाही त्यांनी ठाकरे गटाच्या नेत्यांना लगावला. वरळी कोळीवाड्यातील गोल्फादेवी मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.



**कोळीवाड्यांच्या विकासाचा आराखडा तयार**

**कोळीवाड्यांच्या विकासाचा आराखडा तयार आहे. संपूर्ण मुंबईत त्याची अंमलबजावणी होणार असल्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी या वेळी सांगितले. कोळीवाड्यांच्या सीमांकनाची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

दादर स्थानकापासून ते आदर्श नगर येथील वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानापर्यंत ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात फलकबाजी करण्यात आली होती. जागोजागी भगवे झेंडे, भाजपचे झेंडे लावण्यात आले होते. मुंबईतील विविध भागांतील कोळी बांधव पारंपरिक वेशात खास कोळी वाद्यवृंदाच्या तालावर नृत्य करत कार्यक्रमस्थळी दाखल होत होते. 'वरळी कोळीवाडा क्लिव्हलँड बंदर, १२० मी. नेव्हीगेशन स्पॅन' याची प्रतिकृती कार्यक्रमस्थळी ठेवली होती.

या वेळी व्यासपीठावर भाजपचे नेते आशीष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, नितेश राणे, प्रसाद लाड, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, शिंदे गटाचे नेते, मंत्री दीपक केसरकर, उदय सामंत, प्रवक्ते किरण पावसकर, आमदार यामिनी जाधव, सदा सरवणकर, संजय शिरसाट, माजी आमदार अशोक पाटील, माजी नगरसेविका शीतल म्हात्रे, यशवंत जाधव आदी उपस्थित होते.

## मुंबईत चाकूचा धाक दाखवून २२ लाख रुपये लुटले; त्रिकुटाला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत मागील काही दिवसांपासून प्रवाशांना लुटण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. जोगेश्वरी पूर्वे कडील मोगरा मेट्रोस्थानकाजवळ रुपल प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा कंपनी मॅनेजर रिक्षामध्ये २२ लाख रुपयांची बॅग घेऊन प्रवास करत असताना चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली होती. लूटमार करणाऱ्या तीन आरोपींना जोगेश्वरी पोलिसांनी मालवणी, विरार, ठाणे परिसरातून अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चोरी केलेल्या रकमेपैकी १९ लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. नंदकुमार कांबळी (३० वर्षे), सनी शशिकांत सुर्वे (२८ वर्ष) आणि अभिषेक जयस्वाल (३० वर्ष) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईच्या जोगेश्वरी पूर्वेकडील मोगरा मेट्रो स्थानकाजवळ ६१ वर्षीय एक वृद्ध आपल्या कार्यालयातून घराकडे रिक्षाने जात असताना वाहतूक कोंडीचा फायदा घेत अज्ञात आरोपीने त्या वृद्ध व्यक्तीकडील २२ लाख १९ हजार ६०० इतकी रोख रक्कम असलेली बॅग हिसकावले आणि तो पळून गेला. यावेळी वृद्ध व्यक्ती आणि रिक्षा चालक याने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीने शस्त्र काढल्यामुळे या दोघांचा प्रतिकार कमी पडला. त्यामुळे आरोपी रोख रक्कम असलेली बॅग घेऊन फरार झाला. याविषयीची तक्रार फिर्यादीने जोगेश्वरी पोलीस ठाण्यामध्ये दिली होती. या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी कलम ३९२ भादवि अन्वये नोंद करून तपासात सुरुवात केली.

जोगेश्वरी पोलिसांनी अधिकारी व अंमलदार यांचा समावेश असलेली वेगवेगळी पथके तयार करून तपास सुरू केला आहे. मात्र आरोपींनी आपली ओळख लपावी यासाठी बनावट नंबर प्लेट असलेल्या गाड्या तसेच डोक्यावर हेल्मेट वापरले. यामुळे आरोपीपर्यंत पोहोचण्यास तपास पथकाला काहीशी अडचण आली. परंतु तपास पथकाने फिर्यादीचे कार्यालय तसेच प्रवास केलेला मार्ग, घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर पोलिसांनी फिर्यादीच्या कार्यालयातील एका व्यक्ती आणि मालवणी परिसरातून दुसऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी केली असता आर्थिक निकड असल्याने त्यांनी चारकोप मालवणी येथील एका साथीदाराच्या मदतीने गुन्हा केल्याचे कबिल केले. यानंतर तिन्ही आरोपींना अटक करून न्यायालयात सादर केले असता न्यायालयाने त्यांना १० फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## राज्याच्या विकासात तरुणांना संधी; मुख्यमंत्री फेलोशिपसाठी अर्ज करावे

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

युवकांना राज्य शासनासोबत काम करण्याची संधी देणाऱ्या मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाची अर्ज प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. पुढील २४ दिवस ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक २ मार्च असा आहे. राज्याच्या विकासात योगदान देण्याची इच्छा असणाऱ्या तरुण व होतकरू मुला – मुलींनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

राज्यातील युवकांना प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव देत त्यांच्यातील ऊर्जा, धाडस, कल्पकता आणि तंत्रज्ञानातील गतीचा उपयोग करून प्रशासकीय प्रक्रियांना गती देणे, नावीन्यपूर्ण संकल्पना राबविणे हा मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तसेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांनाही धोरण निर्मिती, नियोजन, कार्यक्रमांची अंमलबजावणी या संदर्भात महत्त्वपूर्ण अनुभव मिळतो. त्यांच्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या कक्षा रुंदावतात. २०१५ ते २०२० या कालावधीत या कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी झाल्यानंतर त्यात खंड पडला होता. लोकाग्रहास्तव हा कार्यक्रम आता पुन्हा सुरू करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री फेलोशिप २०२३ करीता अर्ज करण्यासाठी वय २१ ते २६ वर्षे दरम्यान असावे. ६० टक्के गुणांसह पदवी व एक वर्षाचा कामाचा अनुभव, असे किमान निकष आहेत. ऑनलाइन परीक्षा, निबंध व मुलाखत अशा त्रिस्तरीय चाचणीच्या माध्यमातून गुणवत्तेच्या आधारे फेलोंची निवड केली जाईल. आलेल्या अर्जांमधून ६० युवक मुख्यमंत्री फेलो म्हणून निवडले जातील. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाच्या विविध विभाग व राज्यभरातील विविध कार्यालयांमध्ये हे फेलो वर्षभर काम करतील.

आयआयटी, मुंबई व आयआयएम, नागपूर हे या कार्यक्रमाचे संस्थात्मक भागीदार (ॲकॅडेमिक पार्टनर) आहेत. या दोन्ही संस्थांद्वारे सार्वजनिक धोरणासंबंधातील विविध विषयांचा अभ्यासक्रम फेलो पूर्ण करतील. त्यासाठी त्यांना आयआयटी, मुंबई व आयआयएम, नागपूर यांच्याकडून स्वतंत्र पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र देण्यात येईल.

मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाची तपशीलवार माहिती http://mahades.maharashtra.gov.in/FELLOWSHIP या संकेतस्थळावर उपलब्ध असून काही शंका असल्यास cmfellowship-mahgov.in या ईमेल वर किंवा ८४११९६०००५ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ...तर राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट जाहीर करावे -विक्रांत पाटील

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे की, संभाजीनगर येथे कीला ए अर्क या औरंगजेब याने बांधलेल्या महालाचा जीर्णोध्दार व्हावा. राष्ट्रवादी काँगेस सातत्याने औरंगजेबाच्या नावाचा उध्दार करत आहे,



त्यांना औरंगजेबाचा इतका पुळका का आहे? असा प्रश्न विचारत औरंगजेब जर तुमचे आदर्श असतील तर तसे राष्ट्रवादीने स्पष्ट जाहीर करावे, असे भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे की, संभाजीनगर येथे कीला ए अर्क या औरंगझेब याने बांधलेल्या महालाचा जीर्णोध्दार व्हावा. राष्ट्रवादी काँगेस सातत्याने औरंगजेबाच्या नावाचा उध्दार करत आहे त्यांना औरगजेबाचा इतका पुळका का आहे? जितेंद्र आव्हाड औरंगजेबाचे कौतुक आणि शिवाजी महाराजांचा अपमान करतात. दुसरीकडे संभाजी महाराज धर्मवीर न्हवते अशी वक्तव्य अजित पवार करतात म्हणजे नक्की यांचे आदर्श कोण आहेत? औरंगजेब जर तुमचे आदर्श असतील तर तसे स्पष्ट जाहीर करावे आणि त्याचा फोटो आपल्या झेंड्यावर लावावा जनता राष्ट्रवादीचा खरा चेहरा ओळखून चुकली आहे आणि आगामी काळात त्यांना धडा शिकवल्या शिवाय शिव प्रेमी शांत बसणार नाहीत, असे भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी यांनी सांगितले आहे.

## रायगडात जागरूक पालक, सुदृढ बालक अभियान आजपासून

### ४ लाख ५९ हजारांवर बालकांची होणार तपासणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

वेळेत रोग निदान व उपचार झाले तर पुढची पिढी सुदृढ राहील, या विचाराने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री.तानाजी सावंत यांनी दिलेल्या सूचना नुसार रायगड जिल्हयामध्ये अंदाजे ४ लाख ५९ हजार ९५७ एवढे ० से १८ वर्षापर्यंतची बालके तसेच किशोर वयीन मुलामुलींच्या पूर्वामिन आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने अभियान राज्यभर राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या जागरुक पालक, सुदृढ बालक अभियानाची उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहेत. ० ते १८ वर्षापर्यंतच्या बालकाची/ किशोरवयीन मुलांची प्राथमिक आरोग्य तपासणी, आजारी बालकांना त्वरीत उपचार करणे, गरजू आजारी बालकांना संदर्भ सेवा देऊन उपचार करणे, प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरविणे, सुरक्षित व सुदृढ आरोग्यसाठी समुपदेशन करणे.

तपासणी करण्यासाठी २५७ पथकामधील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आर.बी.एस.के. पथकामधील वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत९ फेब्रुवारी ते ९ एप्रिल या दोन महिन्यामध्ये ४ लाख ५९ हजार ९५७ बालकांची तपासणी करण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत आरोग्य विभागाच्या पथकाद्वारे बालकामधील जन्मजात व्यंग ओळखणे, रक्तक्षय, डोळयांचे आजार, गलगंड, स्वच्छ मुख अभियान, दंतविकार, हृदयविकार, क्षयरोग, कुष्ठरोग, कर्करोग, अस्थमा, एपिलेप्सी सह अन्य आजाराची संदिग्ध रुग्णाची ओळख पटवून त्यांच्यावर त्वरीत औषधोपचार करणार आहेत. तसेच ० ते ६ वयोगटातील मुलामध्ये ब्लब फुट, दुभंगलेली टाकू यावर देखील उपचार होणार आहेत. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार सोनोग्राफी, एक्स रे, ई.सी.जी. केले जाणार आहेत.

## भाजपचे नाशिकमध्ये राज्य अधिवेशन

**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी निवडणुकांसाठी रणशिंग फुंकण्यासाठी १० आणि ११ फेब्रुवारीला भाजपचे राज्य अधिवेशन नाशिकला होणार आहे. या अधिवेशनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व प्रमुख नेत्यांची उपस्थिती लाभणार आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक कोणत्याही क्षणी घोषित होण्याची शक्यता असल्याने या सर्व निवडणुकांची रणनीती ठरविण्यासाठी भाजपने अधिवेशन आयोजित केले आहे. हे दोन दिवसीय अधिवेशन सातपूरच्या डेमोक्रसी हॉटेलमध्ये आठशे पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार आहे.

पान १ वरून

## महाड हादरले!

यामुळे आकाशात धुराचे लोट दिसून येत होते. आग लागताच कंपनीतील कामगारांनी बाहेर धाव घेत सुरक्षित स्थळ गाठले. आग विझवण्यासाठी मेहनत घेणारे कामगार तसेच महाड नगरपालिका, महाड औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन दलाने प्लांटचा ताबा घेतला, मात्र स्फोट झाल्याने आग विझवणारे कामगार आणि परिसरातील कंपन्यांतील कामगारांनीदेखील बाहेर धाव घेतली.

आग विझवण्यासाठी महाड पालिका, एमआयडीसी अग्निशमन दल यांच्यासह खेड, रोह, नागोठणे या ठिकाणांहून अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. दोन तासानंतर आग नियंत्रणात आणली गेली, मात्र ज्या ठिकाणी आग लागली त्या ठिकाणी घातक रसायनांचा साठा आणि प्लांट असल्याने अग्निशमन दलाव्यतिरिक्त अन्य व्यक्तींना प्रवेश निषिद्ध करण्यात आला. या ठिकाणी इथाईल ऑक्साईडचा प्लांट आहे. या प्लांटचे तापमान वाढू लागल्याने कंपनी प्रशासनासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला. स्फोट झाल्यानंतर झालेल्या धावपळीत कंपनीच्या सुरक्षा विभागाचे कामगार आणि शेजारील कंपन्यांमधील कामगार जखमी झाले. जवळपास १३ जण किरकोळ जखमी झाले असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली. जखमींवर महाड उत्पादक संघटनेच्या रुग्णालयात उपचार करून सोडण्यात आले.

घटना घडताच महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, तहसीलदार सुरेश काशीद, नायब तहसीलदार प्रदीप कुडळ, औद्योगिक पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक मारुती आंधळे यांनी घटनास्थळी धाव घेत सूचना केल्या.

## ईडीचे आभार माना! पंतप्रधानांचा विरोधकांना टोला

या वेळी पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस आणि यूपीए सरकारच्या काळातील टूजी, कोळसा आदी सर्व घोटाळे बाहेर काढले. २००४ ते २०१४च्या काळात देशाची बरबादी झाली. घोटाळ्यांमुळे देशाची जगात बदनामी झाली, असे ते म्हणाले. २०१४च्या आधीचे दशक 'लॉस्ट डिकेड' होते आणि २०१४नंतरचे दशक 'इंडिया डिकेड' म्हणून ओळखले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

## अंधेरीतील दुकानात चोरी करणारे दोघे अटकेत

**मुंबई : वृत्तसंस्था**

अंधेरीतील एका दुकानामध्ये चोरी केल्याप्रकरणी अधेरी पोलिसांनी दोघांना अटक केली. आरोपींकडून लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सिद्धेश रघुनाथ पाटील आणि विकास ब्रिजेश मिश्रा, अशी या दोघांची नावे आहेत. आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत नऊ गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मालाड येथे राहणारे व्यापारी कृषिक रमेश गाला यांचे अंधेरीतील कृष्णा कंपाउंडमध्ये एक दुकान आहे. दिवसभरातील काम संपल्यावर ३१ जानेवारी रोजी ते घरी निघून गेले. रात्री उशिरा त्यांच्या दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी सुमारे दोन लाख रुपयांच्या वस्तूंची चोरी केली. दुसऱ्या दिवशी हा प्रकार उघडकीस येताच त्यांनी अंधेरी पोलिसांत तक्रार केली. याप्रकरणी घरफोडीचा गुन्हा नोंद होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संताजी घोरपडे, पोलीस निरीक्षक शिवाजी पावडे यांच्या पथकाने तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रण आणि तांत्रिक माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक किशोर परकाळे, पोलीस अंमलदार राजू पेडणेकर, सूर्यवंशी, लोंढे, जाधव, सोनजे, कापसे, मोरे यांनी अंधेरी परिसरातून सिद्धेश पाटील आणि विकास मिश्रा या दोघांना अटक केली. चौकशीत त्यांनी ही चोरी केल्याची कबुली दिली. या दोघांनी चोरलेला सर्व मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.

## उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार होते!

### दीपक केसरकरांचा मोठा गौप्यस्फोट

**मुंबई : वृत्तसंस्था**


उद्धव ठाकरे महाविकास आघाडीतून बाहेर पडणार होते. तसेच, भाजपाबरोबर पुन्हा युती होणार होती, असा गौप्यस्फोट मंत्री दीपक केसरकर यांनी केला होता. स्वत: उद्धव ठाकरे भाजपाशी हातमिळवणी करण्यासाठी प्रयत्न करत होते, असेही दीपक केसरकरांनी सांगितलं आहे. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

केसरकर म्हणाले, भाजपाबरोबर हिंदुत्वाच्या मुद्द्यावर युती होती. या युतीपासून दूर जाणं उद्धव ठाकरेंना पटलं नव्हतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी भेट देत नव्हते. तरीही भेट घडवून आणली. उद्धव ठाकरेंची पंतप्रधानांशी बोलणी झाली. उद्धव ठाकरेंनी कबूल केलं की, घडलेलं चुकीचं आहे. हे सुधारलं गेलं पाहिजे. तसेच, भाजपाबरोबर जाण्यासाठी उद्धव ठाकरेंनी वचन दिलं होतं. किरकोळ मतभेद झाले असतील, तर ते मिटले गेले पाहिजेत, हे सुद्धा त्यांना पटत होते. काही वेळ व्यक्तीगत आणि कुटुंबावरील आरोपांमुळे निश्चित दुखावले जाऊ शकतात. पण, दुखावलं गेल्यामुळे एवढा मोठा निर्णय, जो आपल्या पक्षाच्या, विचारांच्या विरोधात आहे. हे कितपत योग्य आहे, हे त्यांना सुद्धा पटलेलं असावं म्हणून त्यांनी याला मान्यता दिली होती. मात्र, ते घडलं नाही. हे का घडलं नाही, हे आमदारांना समजून का सांगितलं नाही? आमदारांचं मत हेच होतं की, राष्ट्रवादी, काँग्रेस शिवसेनेला तोडायला निघाले आहेत. यांना शिवसेना संपवायची आहे, महाविकास आघाडीतून बाहेर पडा. कारण, पराभूत उमेदवाराला घेऊन यांची लोकं मतदारसंघात यायची आणि सांगायची की हा उद्याचा तुमचा आमदार आहे. मग शिवसेना टिकणार कशी हा मुळात प्रश्न होता. त्यामुळे कोणीही गद्दारी केली नाही, असं केसरकरांनी म्हटलं.

**दुखवटा**

## श्रद्धा लोखंडे

**नवी मुंबई :** नेरूळ जयंती उत्सव समितीचे कार्याध्यक्ष भगवान



खुपटे यांची कन्या श्रद्धा अभिजित लोखंडे यांचे वयाच्या ३९व्या वर्षी ७ फेब्रुवारी २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा पार्थिवावर नेरुळमधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सिद्राम ओहोळ, वंचित बहुजन आघाडीचे नेते कल्याणराव हनवते, नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष महेश खरे, उपाध्यक्ष एल. आर. गायकवाड, नेरुळ विभाग प्रमुख संतोष काळे यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौक विभागात ठाकरे गटाला गळती सुरूच

## सुधीरशेठ ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपमध्ये; मान्यवरांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चौक येथील दमदार नेते सुधीरशेठ ठोंबरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली विविध पक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा ओढा भाजपकडे दिवसेंदिवस वाढतच आहे. त्या अनुषंगाने चौक विभागातील ठाकरे गटाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मंगळवारी (दि. ७) भाजपमध्ये दाखल झाले. या पक्षप्रवेशामुळे उरण विधानसभा मतदारसंघात भाजप अधिक मजबूत झाला असून ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसला आहे.

महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या मुंबई येथील कार्यालयात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सुधीरशेठ ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ठाकरे गटाचे वरोसे येथील ज्येष्ठ शिवसैनिक मारुती तवले, वाळकू सावंत, दिलीप बेलोसे, तुळशीराम तवले, संजय लाड, धारणी युवासेना उपशाखाप्रमुख मयूर पिंगळे, मंदार पिंगळे, देवेंद्र ठोंबरे, हरीश रसाळ, विवेक ठोंबरे, प्रमोद पिंगळे, आसरे येथील पंकज पोपेटे, सचिन डुकरे, प्रकाश दिसले, विजय पोपेटे, नढाळवाडी येथील निलेश वाघे, वसंत पवार, जांभिवली येथील कल्पेश कोंडीलकर, राकेश शिंदे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, भाजप नेते सुधीरशेठ ठोंबरे, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ, सागर ओसवाल आदी उपस्थित होते.

# उरणच्या कोस्टल रोडवरील झाडे आगीच्या भक्ष्यस्थानी

**उरण : प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सिडकोने पागोटे-भेंडखळ-करंजा बंदर या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रोडवर नारळाची झाडे लावण्याचा व जतन करण्याचे काम हाती घेतले आहे, पण वारंवार ही झाडे आगीच्या ज्वालात भक्ष्यस्थानी पडत असल्याचे पहावयास मिळते.



उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड परिसरातील वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी सिडकोने द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांवर विविध प्रकारची झाडे लावण्याचा संकल्प शासनाच्या माझी वसुंधरा झाडे लावा झाडे जगवा या माध्यमातून हाती घेतला आहे. त्या धर्तीवर सिडकोने पागोटे-भेंडखळ-करंजा बंदर या द्रोणागिरी नोड परिसरातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रस्त्यांवर ८० लाख रुपये खर्च करून नारळाची झाडे लावण्याचा संकल्प हाती घेतला आहे, मात्र या गवतावर वारंवार आगी लागल्याच्या घटना घडत असून या आगीत नारळाची झाडे होरपळून निघत आहेत.

यातच मंगळवारी दुपारी रस्त्यालगत असलेल्या गवतावर आग लागण्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही आग महानगर गॅसच्या पाईपलाईन लगत लागली आहे. महानगर गॅसच्या पाईपलाईनला आगीची झळ बसली तर मोठा अनर्थ घडू शकतो. सिडकोच्या अधिकारी वर्गांनी नारळाच्या झाडाचे जतन, संवर्धन करण्याचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशी नागरिक करीत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी ५.३० वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व वार्षिक दिवस उत्सवाचे आयोजन केले आहे.

या पारितोषिक वितरण समारंभासाठी मुंबई विद्यापीठातील अकाउंट व फायनान्स ऑफिसर डॉ. प्रदीप कामटेकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींशी संवाद साधणार आहेत तसेच विजेत्यांना पारितोषिके प्रदान करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे उपस्थित राहणार आहेत तसेच संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे कार्यकारी सदस्य परेश ठाकूर तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माजी नगरसेविका संजना कदम, माजी नगरसेवक रामजी बेरा, शत्रुघ्न काकडे, प्रभाकर जोशी (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालय), दीपक शिंदे (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालय) यांच्यासह पारितोषिक वितरण समारंभासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, वेगवेगळ्या शाळांचे मुख्याध्यापक परिवेक्षक, सुपरवायझर, शिक्षकेतर कर्मचारीही उपस्थित राहणार आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निषा नायर यांनी सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना व पालकांना या पारितोषिक वितरण समारंभासाठी हजर राहण्यासाठी विनंती केली आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे आजपासून आरोग्यविषयक विविध उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात 'जागरूक पालक, सदृढ बालक' अभियान गुरुवार (दि. ९)पासून राबविण्यात येणार आहे. तसेच महापालिका व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांच्या संयुक्त विद्यमानातून महाआरोग्य शिबिराचेही आयोजन गुरुवारपासून सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर होणार आहे.

याचबरोबर 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या विषयास अनुसरून रक्तदान शिबिरही गुरुवारी विविध ठिकाणी होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचे उद्घाटन गावदेवी मंदिराजवळील महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सकाळी १० वाजता करणार आहेत.

> **महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या आरोग्य सदृढ रहावे या दृष्टीने महाआरोग्य शिबिर सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर होणार आहे. तज्ज्ञ वैद्यकिय आरोग्य अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरांतर्गत रुग्णांच्या तपासण्या करण्यात येणार आहेत. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी या नोंद घ्यावी.**
>
> -डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी, पनवेल मनपा

आठ आठवडे सुरू असणाऱ्या 'जागरूक पालक, सदृढ बालक' या अभियानांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालके, मुलामुलांच्या आरोग्य तपासणी होणार आहे. यामध्ये शासकीय व निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, खाजगी शाळा, अंधशाळा, अंगणवाड्या, वस्तीगृहे , शाळाबाह्य मुले-मुली अशा सर्वांची तपासणी यामध्ये होणार आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली २० पथके करण्यात आली असून एक पथक रोज १५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्येक मुलासआरोग्य तपासणी पत्रक (हेल्थ कार्ड) देण्यात येणार आहे.

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, रोटरी क्लब ब्लड बँक खांदा कॉलनी, सुधागड स्कूल, एमजीएम हॉस्पीटल, कामोठे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५ खारघर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन गुरुवारी करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

# आजपासून रायगड जिल्हा कृषी महोत्सव

## पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा रायगड यांच्या वतीने रायगड जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत खांदेश्वर रेल्वेस्थानकाजवळील सिडको मैदानात करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

जिल्हा कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष २०२३, शासनाच्या विविध कृषी योजना-उपक्रमांची माहिती, कृषी तंत्रज्ञान, नाविण्यपूर्ण प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव, बाजारपेठ व्यवस्थापन, कृषीपूरक व्यवसाय आदी मार्गदर्शन लाभणार आहे, तसेच शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद, प्रात्याक्षिके, कृषी प्रदर्शन, कृषी विषयक परिसंवाद आणि अनुभवी शेतकरी-उद्योजकांची व्याखाने, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारित धान्य, कडधान्ये व खाद्य महोत्सव तसेच फळे, फुले व भाजीपाला महोत्सवदेखील होणार आहे.

कृषी महोत्सव आयोजनासाठी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांचे मार्गदर्शन मिळत असून महोत्सवास शेतकरी व नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.



पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२५वी जयंती मंगळवारी करंजाडे येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# उरण वायू विद्युत निर्मिती प्रकल्पात रक्तदान शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

उरण बोकडविरा येथील महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या वायू विद्युत निर्मिती केंद्रात ९ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या दुर्घटनेत होरपळून जुनियर इंजिनियर विवेक धुमाळे टेक्निशियन कुंदन पाटील (रा. डोंगरी, उरण), विष्णू पाटील (रा. बोकडवीरा, उरण) यांचे निधन झाले होते. या दुर्घटनेतील मृत अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्मरणार्थ महानिर्मिती कंपनीच्या वतीने त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मंगळवारी (दि. ७) महानिर्मिती कंपनीच्या वसाहत संकुलनातील प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



अपोलो हॉस्पिटल बेलापूर यांच्या सहकार्याने आणि महानिर्मिती कंपनीच्या सौजन्याने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या शिबिरात एकूण ६० रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. उरण वायू विद्द्युत निर्मिती प्रकल्पाचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या पुढाकाराने हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यात आले.

या रक्तदान शिबिरासाठी उरण वायू विद्युत निर्मिती प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता श्री. वाघ, श्री. गरुड, कार्यकारी अभियंता श्री. म्हातुकडे, डॉ. अनुप्रिया सावंत, उद्योजक ला. सदानंद गायकवाड तर अपोलो हॉस्पिटलचे डॉ. शमला सुब्रामानी, डॉ. ऋतविक कुलकर्णी, चेतन गोसावी ब्लड बँक इन्चार्ज अपोलो हॉस्पिटल, साद्दिक खान मार्केटिंग मॅनेजर अपोलो हॉस्पिटल आणि स्टाप यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पनवेलमधील प्रशिक्षणार्थींचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कौशल्य प्रशिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर झालेल्या पनवेल मधील प्रशिक्षणार्थींचा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी रविवारी राजभवन येथे सत्कार केला.

जनशिक्षण संस्थान, रायगड या संस्थेने राबविलेल्या कौशल्य प्रशिक्षण या उपक्रमा अंतर्गत रॉयल एजुकेशनल अँड वेल्फेअर असोशिएशनच्या माध्यमातून स्वयंपूर्ण झालेल्या या प्रशिक्षित महिलांचा 'पंखांना बळ कौश्यल्याचे : यशस्वितांचा सत्कार' या कार्यक्रमांतर्गत सामूहिक सत्कार करण्यात आला. या उपक्रमांतर्गत रॉयल एज्युकेशनच्या संस्थापिका नाझनीन पालेकर यांनी सुमारे २०० महिलांना कौशल्य प्रशिक्षण दिले होते.

देशाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. या दृष्टीने रायगड जिल्ह्यातील ३६००० महिलांना विविध जीवनोपयोगी कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंपूर्ण बनविण्याचे फार मोठे काम जनशिक्षण संस्थान या संस्थेने केले असल्याचे सांगून राज्यपालांनी संस्थेला कौतुकाची थाप दिली.

कार्यक्रमाला जनशिक्षण संस्थान, रायगडचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, निमंत्रक डॉ. मेधा सोमय्या, युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. किरीट सोमया, यशस्विता रत्नप्रभा बेल्हेकर, डॉ. विजय कोकणे आदी उपस्थित होते.

या वेळी रॉयल एजुकेशनल, सोशिअल अँड वेल्फेअर असोशिएशनच्या संस्थापिका नाझनीन पालेकर व प्रशिक्षणार्थी प्रीती नाईक, माधुरी जाधव, वर्षा भोईर, स्वाती धस, वर्षा शिर्के, नसीम बानो, रिहाना सय्यद, सविता विश्वकर्मा, माधुरी अडसुळे आणि निशा निकम आदींना राज्यपालांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



# हेमंत भोईर उपतालुका प्रमुखपदी



**उरण : बातमीदार**

राष्ट्रीय कामगार नेते तथा जेएनपीटी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष हेमंत भोईर यांची बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाच्या उरण उपतालुका प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

नियुक्तीपत्र कर्जतचे आमदार तथा रायगड जिल्ह्य प्रमुख महेंद्र थोरवे तसेच रायगडचे उप-जिल्ह्य प्रमुख अतुलशेठ भगत यांच्या हस्ते देण्यात आले. त्यांनी भोईर यांचे अभिनंदन केले. तसेच पक्ष वाढीसाठी खूप प्रयत्न करून उरण तालुक्यात बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाला बळ देण्यासाठी पक्ष संघटना मजबूत करण्याच्या सुचना केल्या.

नवनिर्वाचित उपतालुका प्रमुख हेमंत भोईर यांनी त्याच्या भावना व्यक्त करताना वरिष्ठांनी माझ्यावर दिलेल्या उपतालुका प्रमुख या जबाबदारीला साजेल असे कार्य करून उरण तालुक्यातच नव्हे तर रायगड जिल्ह्यात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचे आश्वासन वरिष्ठांना दिले.

हेमंत भोईर यांची शिवसेना उपतालुका प्रमुखपदी नियुक्ती झाल्याचे समजताच त्यांच्यावर तालुक्यातूनच नव्हे, तर रायगड जिल्ह्यातून व त्यांच्या चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पनवेलमध्ये रविवारी हिंदू राष्ट्र जागृती सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदूंवर होणाऱ्या आघातांविरोधात वाचा फोडण्यासाठी, हिंदूसंघटन तसेच प्रत्येकाचा विचार करणाऱ्या आदर्श अशा हिंदू राष्ट्राचा आवाज बुलंद करण्यासाठी हिंदू जनजागृती समिती आणि समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने रविवारी (दि. १२) दि मिडल क्लास को ऑप. हाऊसिंग सोसायटीचे मैदान, पनवेल येथे सायंकाळी ५ वाजता हिंदू राष्ट्र-जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती हिंदू जनजागृती समितीचे मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा समन्वयक सागर चोपदार यांनी दिली. पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

### उद्या जनजागृतीपर वाहनफेरी

**हिंदू राष्ट्र-जागृती सभेचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून जनजागृतीसाठी १० फेब्रुवारीला पनवेलमध्ये भव्य वाहनफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल येथे होणाऱ्या हिंदू राष्ट्र-जागृती सभेचे थेट प्रक्षेपण फेसबुकवरद्वारे पाहता येणार आहे. या सभेत विविध मान्यवर वक्ते मार्गदर्शन करणार असून या ठिकाणी क्रांतिकारकांविषयी माहिती देणारे आणि हिंदूंना प्रतिदिन करावयाच्या धर्माचरणाच्या कृती, साधना यांविषयी मार्गदर्शन. करणारे फलक प्रदर्शन तसेच हिंदूंना धर्मशिक्षण देणाऱ्या विविध ग्रंथांचे प्रदर्शनही लावण्यात येणार आहे.**

या वेळी हिंदू जनजागृती समितीच्या रणरागिणी शाखेच्या डॉ. दीक्षा पेंडभाजे उपस्थित होत्या. हिंदू जनजागृती समितीचे सागर चोपदार पुढे म्हणाले, पनवेलसह रायगडमधील विविध भागात मोठ्या प्रमाणात हिंदू बांधवांचे धर्मांतर होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा वारसा लाभलेल्या आपल्या जिल्ह्यातील रायगड, कुलाबा आदी गड-दुर्गांवर इस्लामी अतिक्रमणे करुन एकप्रकारचा लॅण्ड जिहाद सुरू आहे. लॅण्ड जिहाद यांसारखे हिंदूंवरील विविध आघात रोखण्यासह हिंदूंना पुन्हा एकदा सन्मानाने जगण्यासाठी हिंदू राष्ट्रफ स्थापण्याची आवश्यकता असून या हिंदू राष्ट्र जागृती सभांच्या माध्यमातून हिंदू जनजागृती समितीच्या वतीने देशभर जनजागृती केली जात आहे.

पनवेल पंचक्रोशीसह रायगड जिल्ह्यातील विविध भागांत या सभेचा मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला असून समस्त हिंदुत्वनिष्ठांनी ही सभा यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे. हिंदू जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना यांचे कार्यकर्ते पनवेलमधील विविध भागात बैठका, व्याख्याने, हस्तपत्रके, भित्तीपत्रके, फ्लेक्स फलक या माध्यमांतून प्रसार करत आहेत तसेच व्हॉट्सअॅप, ट्विटर, फेसबुक या सोशल मिडियाच्या माध्यमांतूनही मोठ्या प्रमाणात या सभेचा प्रसार करण्यात आला असून लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

या सभेला समस्त हिंदूंनी जात-पात, संप्रदाय, संघटना, पक्ष आदी बिरुदावले बाजूला ठेवून एक हिंदू म्हणून सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ८०८०२०८९५८ या क्रमांकावर संपर्क करावा, असे हिंदु जनजागृती समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## संपादकीय

# उथळ प्रश्न, सखोल उत्तरे

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मंगळवारी संसदेमध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबाबतच्या आभारप्रदर्शन ठरावावर बोलताना पंतप्रधान मोदी यांच्यावर बेफाम आरोप केले. त्या आरोपांना ना शेंडा होता, ना बुडखा. खरे तर, मोदी यांना अशाप्रकारे प्रश्न विचारणे हे कुठल्याही काँग्रेस खासदारासाठी हास्यास्पदच ठरते. राहुल गांधी हे स्वत: गैरव्यवहारांच्या आरोपांखाली जामिनावर आहेत. अशा लोकांना मोदींसारख्या स्वच्छ चारित्र्याच्या नेतृत्वाला प्रश्न विचारण्याचा कुठलाही नैतिक अधिकार नाही.

**'हिंडेनबर्ग रिसर्च' या संस्थेतर्फे अदानी उद्योग समुहावर जे कथित आरोप झाले, त्याने देशभर काहुर माजले होते. शेअरबाजाराची प्रचंड पडझड झालीच आणि शिवाय केंद्र सरकारवर अनेक आरोप झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विरोधक तुटून पडले. हे स्वाभाविकच होते. अशा एखाद्या प्रकरणात सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचा अधिकार विरोधीपक्षाला असतोच. संसदेचे अधिवेशन सुरू होण्याचा मुहुर्त साधून हिंडेनबर्ग रिसर्च या संस्थेने अदानी उद्योगसमुहावर तडाखेबंद हल्ला चढवत आरोपांची राळ उठवली होती. हिंडेनबर्ग रिसर्च ही काही सोवळी आर्थिक संशोधन संस्था नव्हे. जगभरातील शेअरबाजारांमध्ये शॉर्टसेलिंगचा फायदा उकळणारी ही एक कंपनी आहे. म्हणजेच एखाद्या कंपनीचा शेअर चढ्या भावात विकला जाणार असेल तर काहीतरी घातपात करून किंवा त्या कंपनीची बदनामी करून शेअरचे भाव खाली आणायचे आणि कमी दरांमध्ये तेच शेअर विकत घेऊन अल्पावधीत विकून टाकायचे. याचा अर्थ कमी पैसे खर्च करून जास्तीत जास्त नफा उकळण्याचा हा शॉर्टकट आहे. विशेष म्हणजे यामध्ये बेकायदा असे काहीही नाही. अदानी उद्योगसमुहात भारतीय राष्ट्रियीकृत बँका आणि एलआयसी यांच्या प्रचंड प्रमाणात गुंतवणुका आहेत किंवा त्यांनी अदानी समुहाला कर्जे दिलेली आहेत. या मुद्द्यावर विरोधी पक्षांनी मोदी सरकारला धारेवर धरले. उद्योजक गौतम अदानी आणि मोदी यांचा संबंध काय, अदानी यांच्या विमानातून पंतप्रधानांनी किती वेळा प्रवास केला अशा प्रकारचे अत्यंत उथळ आणि अभ्यासशून्य प्रश्नवजा आरोप राहुल गांधी यांनी केले. त्यामुळे देशभरातील मोदी समर्थकांमध्ये संतापाची लाट उसळली नसती तरच नवल. पंतप्रधान मोदी यांनी ठरावाला उत्तर देताना बुधवारी संसदेमध्ये या सर्व आरोपांची दखल घेतली. ती घेत असतानाच गेल्या नऊ वर्षांत आपल्या सरकारने करून ठेवलेल्या प्रचंड कामाचा पाढा वाचून विरोधकांची तोंडे गप्प केली. राहुल गांधी किंवा विरोधी पक्षातील अन्य कुणीही संसदेमध्ये अभ्यास करून बोलत नाहीत. एकेकाळी याच संसदेमध्ये अभ्यास, चिंतन आणि मनन करणारे विरोधक होते. अभ्यासपूर्ण समीक्षेनंतर त्यांना तोंड देणे सत्ताधाऱ्यांना जड जात असे, परंतु अशा प्रकारे सकारात्मक टीका करणारा विरोधी खासदार गेल्या नऊ वर्षांत आपल्याला भेटलेला नाही, अशी खंत पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. ती रास्तच म्हणायला हवी. सकारात्मक टीका आणि नकारात्मक वितंडवाद यामध्ये खूप फरक असतो. राहुल गांधी यांनी केलेले आरोप हे दगड मारून पळून जाण्याचा प्रकार वाटतो. अशा प्रकारचे राजकारण जनता कधीही स्वीकारत नाही. त्यादृष्टीने पाहू गेल्यास काँग्रेस पक्ष नऊ वर्षांपूर्वी सत्ताधारी म्हणून नापास झाला. तसाच तो आता विरोधी पक्ष म्हणूनदेखील अपयशी ठरत आहे. यापुढे संसदेत तरी तयारी करून जाण्याचे राहुल गांधी यांनी ठरवावे.**

# वसा आणि वारसा समाजकारणाचा...



ऐंशी टक्के समाजकारण आणि वीस टक्के राजकारण ह्या शिवसेना प्रमुखांच्या मुलमंत्राचा खरा पाईक म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. राजकारण करत असताना त्यांच्यातला समाजसेवक कायम जागा असतो, म्हणून त्यांचे वेगळेपण इतरांपेक्षा जास्त जाणवते.अनेक वेळा त्यांना भेटण्याचा योग येतो तेव्हा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांची कळकळ आणि दिलेला शब्द पाळण्यासाठी तळमळ जास्त जाणवते.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन, धर्मवीर आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली सामान्य शिवसैनिक म्हणून राजकीय आयुष्याला सुरुवात करून आज मुख्यमंत्रीपदापर्यंत झेप घेतलेले ठाणे जिल्ह्यातील आघाडीचे नेते. मितभाषी, दिलेल्या शब्दाला जागणारे, मैत्री जपणारे, बेरजेच्या राजकारणावर विश्वास असलेले अशी ओळख असलेले 'लोकनाथ'. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांच्या नेतृत्वाखाली ८०च्या दशकात शिवसैनिक म्हणून सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिलं आणि कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना एक सामान्य शिवसैनिक ते आज राज्य मंत्रिमंडळातील एक प्रभावशाली कॅबिनेट मंत्री ते मुख्यमंत्री अशी थक्क करणारी वाटचाल केली. राजकारणात केवळ घराणेशाहीच चालते, या समीकरणाला छेद देत एकनाथ शिंदे यांनी झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, वाट्टेल तितकी मेहनत घ्यायची तयारी, समोरच्याचा विश्वास जिंकण्याची हातोटी आणि असामान्य नेतृत्त्वगुण यांच्या जोरावर पक्षनेतृत्त्वाने वेळोवेळी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवला. त्यामुळेच आनंद दिघे यांच्या अकाली निधनानंतर ठाणे जिल्ह्यात निर्माण झालेली नेतृत्त्वाची पोकळी एकनाथ शिंदे यांनी रात्रीचा दिवस करून भरून काढली. ठाणे महापालिकेतील शिवसेनेच्या गेल्या २५ वर्षांच्या इतिहासात शिवसेनेला प्रथमच एकहाती सत्ता प्राप्त झाली. त्यानंतर झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच फडकला.

२०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्षनेतेपदासारखे महत्त्वाचे पद भुषवून त्यांच्या आजवरच्या वाटचालीचा गौरव केला. विरोधी पक्षनेते म्हणून मिळालेल्या जेमतेम महिनाभराच्या काळात त्यांनी दुष्काळ आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या दुरवस्था लक्षात घेत शेतकऱ्यांच्या शेताबांधावर पायपीट करत त्यांनी विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र असा जवळपास संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला.

कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला असून अक्षरश: मृत्यूशय्येवरील एमएमआरडीएला पुन्हा आपल्या पायावर यशस्वीरित्या उभं केलं आहे. राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला नागपूर–मुंबई समृद्धी महामार्गाने आकार घेत नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन करत ना. शिंदेच्या पाठीवर कौतूकाची थाप दिली. विशेष म्हणजे समृद्धी महामार्गात शेतकर्यांना या प्रकल्पात भागिदार करून घेत त्यांना या योजनेचे फायदे समजावून सांगून, त्यांना विश्वासात घेऊन, या प्रकल्पात सहभागी करून घेण्यात ना. शिंदे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. २०२० हे वर्ष कोरोना काळात अत्यंत तणावाचं गेलं. महाराष्ट्रातील ठाणे, मुंबई आणि पुणे या जिल्ह्यांना कोरोनाने जबर खिळवून ठेवले असताना ना. एकनाथ शिंदे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून तळागाळातल्या प्रत्येक माणसापर्यंत उपचारासाठी कार्यरत राहिले.

कोरोना झाल्यानंतरही रुग्णालयातही ते स्वस्थ बसले नाही. प्रशासकीय कामांचा तेथूनही त्यांनी निपटारा केला. त्याचप्रमाणे त्यांच्या नेतृत्वाखाली एमएसआरडीसीच्या माध्यमातून वांद्रे–वर्सोवा सी लिंक, ठाणे–बोरिवली टनेल, शीळ–कल्याण एलिव्हेटेड रोड, ऐरोली–काटई बोगदा, ठाणे–बोरीवली बोगदा, श्री स्वामी समर्थ क्षेत्र अक्कलकोटचा कायापालट, पुणे रिंग रोड, मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे क्षमता विस्तार असे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत. वांद्रे–वर्सोवा सी लिंकचे काम लवकरच सुरू होणार आहे. त्याचप्रमाणे, एकनाथ शिंदे यांनी एमएसआरडीसीच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न सुरू केले असून त्याअंतर्गत नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे राज्यातील काही महत्त्वाचे प्रकल्प एमएसआरडीसी राबवत आहेत.

सार्वजनिक बांधकाम खाते सांभाळत असताना त्यांच्यावर आरोग्य खात्याचा अधिक पदभार देण्यात आला. आरोग्यमंत्रीपद हाती येताच पालकमंत्र्यांनी ठाणे जिल्हा सिव्हील रुग्णालय, उल्हासनगरातील मध्यवर्ती रुग्णालय आणि कामगार रुग्णांलयांच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले. तर आरोग्य विभागात मेगा भरतीचीही घोषणा केली. आघाडी सरकारमध्ये आर. आर. पाटील उपमुख्यमंत्री असताना अतिदुर्गम आणि नक्षली कारवायांनी त्रस्त असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद त्यांनी स्वीकारलं होतं. आज तिच जबाबदारी ना. एकनाथ शिंदे यांनी स्वतःच्या शिरावर घेतली आणि गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी कार्यतत्पर झाले आहेत. केरळमध्ये महाभयंकर पूर ओढवला. हजारो नागरिकांचा जीव गेला तर अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. अशावेळी ना. शिंदे आणि खा. श्रीकांत शिंदे यांच्या डॉक्टर पथकाने केरळला जावून पुरग्रस्तांची सुश्रूषा केली व त्यांना आर्थिक मदतीचे वाटप केले.

ठाणे जिल्ह्यात धोकादायक इमारतींचा प्रश्न गंभीर असून गेल्या एक तपाहूनही अधिक काळ एकनाथ शिंदे या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी लढा दिला. आमदार झाल्यानंतर गेल्या १२ वर्षांच्या काळात त्यांनी विधानसभेत विविध संसदीय आयुधांचा वापर करून सातत्याने हा प्रश्न मांडला. अनेकदा निलंबन पत्करलं, मुख्यमंत्र्यांना घेराव घातला, ठाणे ते मंत्रालय असा मोर्चा नेला. अखेरीस २०१४ साली तत्कालीन सरकारने ठाण्यातील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागू केली. एका मोठ्या लढ्याला यश तर मिळालं; पण या योजनेत ज्या त्रुटी होत्या त्या दूर करण्यासाठी पुन्हा नवी लढाई सुरू झाली. ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर या लढ्याला नवं बळ मिळालं आणि आज या योजनेतील सर्व अडचणी दूर होऊन ठाणे शहरासाठी क्लस्टर योजना लागू झाली आहे. त्यापुढच्या टप्प्यात संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी क्लस्टर योजना यशस्वी व्हावी, यासाठी एकनाथ शिंदे प्रयत्नशील असून त्यालाही यश मिळत आहे. ठाणे जिल्ह्यासह गडचिरोली पालकमंत्रीपद स्वीकारत या जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी समर्थ नेतृत्व त्यांनी केले.

प्रशासकीय व राजकीय कारकिर्द जगत असतानाच त्यांनी गेल्या वर्षी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण करत पदवीधर होवून आजच्या तरुणांपुढे उच्च शिक्षणाचा आदर्श निर्माण केला. त्यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे हे स्वतः ऑर्थो डॉक्टर असल्याने शिंदे कुटुंबाने जनतेच्या आरोग्य सेवेकडे विशेष लक्ष दिले आहे. ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणी जनतेच्या सोयीसाठी आरोग्यकेंद्र सुरू करून आरोग्य शिबिरे राबविली जात आहेत. दरवर्षी ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री धर्मवीर आनंद दिघेंनी सुरू केलेल्या रक्तदान शिबिरात स्वतः खासदार श्रीकांत शिंदे रक्तदान करून ही मोहिम अविरत सुरू ठेवली आहे.

शिवसेना नेता, नगरविकासमंत्री, सार्वजनिक बांधकाममंत्री आणि ठाणे–गडचिरोली जिल्ह्याची जबाबदारी पेलल्यानंतर आता बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजपासोबत सत्ता स्थापन करत 'जनतेचे सरकार' स्थापन केले. त्याच विश्वासाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या साथीने मुख्यमंत्रीपद सांभाळत खीकया अर्थाने 'लोकनाथ' होण्याचा मान त्यांना मिळाला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला पाईक, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आशिर्वाद, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात विकासाचा महामेरू उभारत जनतेला चांगले आरोग्य, चांगल्या सेवा देण्यासाठी आई भवानी ना. एकनाथ शिंदे यांना कायम यश देवो याच वाढदिवसानिमित्त सदिच्छा!

**–दशरथ पाटील, ज्येष्ठ नेते, बाळासाहेबांची शिवसेना**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर फसवणुकीपासून कसे सतर्क राहाल? जाणून घ्या

व्हॉट्सॲपपर करत असताना एखाद्या अनोळखी नंबरवरून तुम्हाला लिंक आली आणि तुम्ही त्यावर जर क्लिक करून त्यावरील कोणत्याही ऑफरबाबत माहिती असेल तर तुम्ही सतर्क राहणे गरजेचे आहे. सायबर क्राईममध्ये तुम्हाला फसवण्यासाठी हा एखादा सापळासुद्धा असू शकतो.



आपण एखाद्या नवीन ठिकाणी जात असतो तिथे आपली काही नवीन माणसांशी ओळख होत पण त्या ओळखीने आपले त्यांच्यासोबत व्हाट्सअॅपवर बोलणे सुरू होते, मात्र नवीन व्यक्तीशी बोलताना त्याने तुमची वैयक्तिक किंवा तुमच्या आर्थिक गोष्टींबद्दल विचारणा केल्यास त्याला काही न सांगण्याची सतर्कता तुम्ही बाळगणे आवश्यक आहे.

काही वेळा अनेक ठिकाणी जातो चौकशीसाठी किंवा माहिती घेण्यासाठी तेव्हा आपण आपला व्हॉट्सअॅपचा मोबाईल नंबर तिथे देतो. त्यावेळी त्या व्हॉट्सअॅप नंबरवर बँक, सरकारी किंवा खासगी कार्यालये यांच्या नावाने अज्ञात व्यक्तीदेखील तुम्हाला संपर्क करत असतात. तो फोन उचलल्यास त्यावरून तुमचे खाते ब्लॉक करण्याची धमकी दिली जाते. यावरून जर बँकेने किंवा सरकारी कार्यालयाशी संबंधित माहिती कोणी व्हॉट्सअॅपवर विचारली तर तुम्हाला कोणीतरी फसवण्याचा प्रयत्न करत आहे हे तुम्ही समजून घेतले पाहिजे.

व्हॉट्सअॅपने टू–स्टेप व्हेरिफिकेशन फिचर ॲक्टिव्ह करून वापरकर्त्यांना अतिरिक्त सुरक्षा ऑफर केली आहे. वापरकर्ते ज्या वेळेस त्याचे अकाउंट रिसेट करू इच्छितात आणी अकाउंटमधील मजकूर पाहण्यासाठी त्यांना सहा आकडी पिन टाकणे आवश्यक असते. स्मार्टफोन किंवा सिम कार्ड चोरीस गेल्यावर हेच फिचर फायदेशीर ठरते.

व्हॉट्सअॅपवर तुम्ही जर एखाद्या सायबर क्राईम बळी झाला असाल किंवा से झाल्याचा तुम्हाला संशय आल्यास तुम्ही त्याबद्दल तक्रार करू शकता. व्हाट्सअॅपवर वापरकर्त्यांना संबंधित चॅटला ब्लॉक करून तक्रार करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

सर्वप्रथम आपले व्हॉट्सअॅप ओपन करावे. त्यानंतर उजव्या बाजूला असणाऱ्या तीन डॉट वॉर क्लिक करावे. तीन डॉटवर क्लिक केल्यावर सेटिंगमध्ये जावे. नंतर प्रायव्हसी ऑप्शनवर क्लिक करावे. स्क्रोल केल्यावर ब्लॉक ऑप्शनवर जावे. त्यानंतर जायचा नंबर ब्लॉक करायचा आहे ते सिलेक्ट करून प्लस आयकॉनवर क्लिक करावे. इथे रिपोर्टचा देकील ऑप्शन असतो. ब्लॉक सोबतच वापरकर्ते रिपोर्ट करू शकतात.

# कामगार चळवळीतील नेते नारायण लोखंडे



## निमित्त

काही वर्षांपूर्वी लालबाग परळ नावाचा मराठी चित्रपट आला होता. तो गिरणी कामगारांनी संप केल्यानंतर त्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागले होते त्या विषयावर आधारित होता. वेळेचे बंधन असल्यामुळे कामगारांच्या सर्वव्यापी समस्या दाखविण्यात त्यात मर्यादा आल्या. कामगार चळवळीचा उदय, त्यांचे प्रश्न, संप, मोर्चे इत्यादीची माहिती आपण समजून घेणार आहोत. यामध्ये कामगार चळवळीतील अग्रणी नारायण मेघाजी लोखंडे यांचे नाव आवर्जून घेतले पाहिले.

नारायण लोखंडे नोकरीच्या निमित्ताने भायखळ्याला जायचे. त्यामुळे त्यांना आजूबाजूला मोठ्या प्रमाणात मजूर दिसत असत. त्यांचे हलाखीचे जीवन ते पाहत होते. तेव्हापासून त्यांच्या मनामध्ये मजुरांबाबत, कामगारांबाबत आत्मियता निर्माण झाली. आपण या कामगारांच्या कल्याणासाठी काहीतरी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत, त्या राबविल्या पाहिजेत हा विचार येत होता, पण हे सर्व आपण त्यांच्यापासून दूर राहून करू शकत नाही याची जाणीव झाल्यामुळे लोखंडे यांनी केवळ आणि केवळ कामगारांचे प्रश्न समजावेत, त्यांना मुळातून समजून घेता यावे हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून पोस्टाची सुखासुखीची नोकरी सोडली आणि स्टोअर कीपरची नोकरी स्वीकारली. आज एवढे धाडस कोणी करू शकेल काय? या प्रसंगावरून आपण म्हणू शकतो की, कामगारांच्याबाबत त्यांच्या मनात किती प्रेम होते. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांची कशाचाही त्याग करण्याची तयारी होती.

कामगार आणि भांडवलदार, मालक यांचा संघर्ष हा काही आजचा नाही. तो पूर्वापार चालत आलेला आहे. कामगारवर्गासाठी नारायण लोखंडे यांनी प्रचंड संघर्ष केला. आज कामगार बांधव रविवारची सुटी मोठ्या आनंदात आपल्या परिवारासोबत घालवत असतो. या साप्ताहिक सुटीचे श्रेय लोखंडे यांना जाते.

लोखंडे यांच्यावर संपाच्या काळात त्यांना बदनाम करण्यासाठी संप मोडीत काढण्यासाठी त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप करण्यात आला होता, पण तो प्रयत्नही यशस्वी झाला, कारण कामगारांचा लोखंडे यांच्यावर विश्वास होता. मुंबईचा कामगारवर्ग म्हणजे ना. मे. लोखंडे व ना. मे लोखंडे म्हणजे मुंबईचा गिरणी कामगार जणू हे समीकरणच रूढ झाले होते. यावरून कामगारांप्रती त्यांच्या कामाची महती आपण समजू शकतो. लोखंडे यांनी फक्त मजूर किंवा गिरणी कामगारांसाठीच काम केले असे नाही. ते मुळात शेतकरी होते. त्यांनी शेतकऱ्यांसाठीसुद्धा कामे केलेली होती.

लोखंडे यांनी आपल्या जीवनकाळात मोठ्या प्रमाणात आंदोलने, मोर्चे, संप केले, पण ते करीत असताना त्यांचे एक धोरण होते. ते म्हणत आपल्या हक्कासाठी, अन्यायाविरुद्ध लढत असताना कधीच कायदा हातात घ्यायचा नाही. हा किती प्रगल्भ विचार होता.

साधारणतः अडीच वर्षांपूर्वी आपण सर्वांनी कोरोना या विषाणूविरुद्ध लढा दिला. आज विज्ञान एवढे प्रगतशील झालेले आहे. तरीसुद्धा कोरोना काळात आपल्याला किती मोठ्या संकटांना सामोरे जावे लागले होते. आता विचार करा त्या काळात जेव्हा प्लेगची साथ आली होती तेव्हा काय स्थिती उद्‌भवली असेल. या प्लेगच्या कठीणप्रसंगी लोखंडे यांनी जे कार्य केले ते जाणून घेलत्यावर तर अंगावर काटाच उभा राहतो. त्यांचे कार्यकर्ते लोखंडे यांना समजावून सांगत होते, तुम्ही प्लेगच्या काळात काम करू नका. लोखंडे यांनी स्पष्ट सांगितले. माझे बांधव प्लेगच्या संकटात असताना मी घरात भित्रासारखा बसून राहू शकत नाही. त्यांनी लोकांची सेवा सुरूच ठेवली. ती करता करता त्यांनाही प्लेग झाला आणि त्यातच त्यांचे वयाच्या केवळ ४८व्या वर्षी ९ फेब्रुवारी १८९७ रोजी निधन झाले. अशा या संघर्षशील नेत्याच्या कार्याचा आढावा 'सत्यशोधक कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र' या पुस्तकात शब्दबद्ध करण्यात आला आहे.

**–राजाराम सूर्यवंशी, बदलापूर**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : रेल्वे मालगाडीचे डबे मोजण्याचा आनंद सोशल मीडिया व स्मार्ट फोनवर वेळ घालविणाऱ्या आजच्या नवीन पिढीला अनुभवता येणे दुरापास्त आहे. अशाच एका मालगाडीचे तळोजा रेल्वेस्थानक परिसरातील हे दृष्य.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# दातांसाठी योग्य ब्रश जाणून घेण्यासाठी टिप्स

एक खरं स्मित हे हृदयातून येते, पण निरोगी हास्य हे निरोगी तोंडातून येते. शरीराच्या प्रत्येक अवयवाचे आरोग्य महत्त्वाचे आहे, परंतु तोंडाच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. तो आपल्या शारीरिक आरोग्याचा एक महत्त्वाचा घटक आहे.



अनेक संशोधनांतून असं दिसून येतं की खराब तोंडी आरोग्यामुळे हृदयविकार, फुफ्फुसाचे आजार आणि इतर अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात, असे डॉक्टरांनी नमूद केले. म्हणूनच तोंडाच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे.

### चांगल्या मौखिक आरोग्याची चिन्हे

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, ज्याप्रमाणे खराब मौखिक आरोग्य संकेत देतात, त्याप्रमाणे चांगल्या मौखिक आरोग्याचीही काही लक्षणे दिसून येतात. जर तुमच्या दातांचा रंग पांढरा स्वच्छ असेल, हिरड्या गुलाबी आणि निरोगी दिसत असतील आणि फ्लॉस केल्यावर रक्त येत नसेल, श्वासाला दुर्गंधी येत नसेल आणि गरम किंवा थंड पदार्थ खाताना झिणझिण्या येत न,सतील, तर तुमचे तोंडाचे आरोग्य चांगले मानले जाऊ शकते.

### कसा टूथब्रश वापरावा?

डॉक्टर सांगतात की, दात स्वच्छ करण्यासाठी मऊ ब्रिस्टल टूथब्रश आणि फ्लोराईडवर आधारित असलेल्या टूथपेस्टचा वापर करावा. तसेच दर तीन महिन्यांनी टूथब्रश बदलणे ही चांगली सवय आहे, यामुळे तोंडात कॅव्हिटी तयार होण्यास प्रतिबंध करता येतो.

### ब्रशवर टूथपेस्टचे प्रमाण किती असावे?

बहुतांश लोकांना दात घासताना ब्रशवर भरपूर टूथपेस्ट घेण्याची सवय असते, त्यामुळे तोंड अधिक स्वच्छ होईल असं त्यांना वाटतं. पण ही चुकीची संकल्पना आहे, कारण जास्त टूथपेस्ट वापरल्याने काहीही फायदा होत नाही. तुम्ही फक्त एका मटाराच्या दाण्याच्या आकाराची टूथपेस्ट वापरली तरी ती पुरते व तोंड आणि दात स्वच्छ होतात.

### 'हे' पदार्थ दातांना चिकटत नाहीत

दातांमध्ये उरलेल्या अन्नामुळे कॅव्हिटी होऊ शकते, दात किडू शकतात. म्हणूनच डॉक्टर कुरकुरीत फळे आणि भाज्या खाण्याचा सल्ला देतात. हे पदार्थ नीट चावून खाल्ले तर ते दातांमध्ये विशेष अडकून रहात नाहीत.

### 'या' ओरल हेल्थ टिप्सकडे द्या लक्ष

दर ६–८ महिन्यांनी दंतवैद्याकडून तपासणी करून घ्या. गोड पदार्थ जास्त प्रमाणात खाऊ नका. दिवसातून दोनदा ब्रश आणि फ्लॉस करा आणि जीभ स्वच्छ करायला विसरू नका. कोणताही पदार्थ खाल्ल्यास, प्रत्येक वेळेस तुमचे तोंड स्वच्छ धुवा. कोणत्याही स्वरूपात तंबाखूचा वापर टाळा.

# जलद रेल्वेगाड्यांना थांबा द्या

## ■ पॅसेंजर गाडीचे तिकीट पूर्ववत करावे; रोहेकरांची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून रोहा तालुक्याची ओळख. या ठिकाणी जलद रेल्वे गाड्यांना थांबा द्यावा अशी मागणी रोहेकरांतून होत आहे.

रेल्वे येणार तालुक्यासह परिसराचा विकास होणार म्हणून नागरिकांनी आपल्या जमिनी दिल्या. परंतु रोहेकरांना अद्याप हव्या अशा सुविधा मिळत नाहीत. रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून रोहा तालुक्याची ओळख. या तालुक्यातुनच पुणे, रोहा, माणगाव, ताम्हाणे मार्गे मुरुड, खोपोली मार्गे पुणे राज्यमार्ग आहे.

दुसरीकडे तळ कोकणात जाणारा मुंबई गोवा महामार्ग हे रस्त्याचे जाळे तालुक्यात पसरलेले आहे. या रस्त्यांना पूरक म्हणून रेल्वे महामार्ग झाला असून या सर्व जवळून एकमेकांच्या पूरक असताना यातून या परिसराचा विकास होणार आहे त्यामुळे रेल्वे आल्याने रोहेकरांना निश्चितच फायदा देऊन जाईल असे बोलले जात होते. आज रेल्वे आली आहे.

या मार्गातून जाणाऱ्या अनेक गाड्या सुसाट सुटतात. अनेक प्रवाशांना याचा फायदा होतो, परंतु यातील बहुतांशी जलद गाड्यांना रोह्यात थांबा नसल्याने रोहेकरांना याचा फायदा होत नाही. त्यामुळे मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक असलेले व जिथून कोकण रेल्वे सुरू होते त्या रोहा रेल्वे स्थानकावर जिल्ह्यात गाड्यांना थांबा मिळावा अशी रोहेकरांची मागणी आहे.

रोहा तालुक्यात धाटाव औद्योगिक क्षेत्र, नागोठणे औद्योगिक क्षेत्र, लगत असलेला तळा, मुरुड, अलिबाग,पाली आदी पर्यटन क्षेत्र असल्याने सातत्याने रोहेकडे वर्दळ असते.

देशातील अन्य राज्यातून मोठ्या प्रमाणात या औद्योगिक क्षेत्रात नोकरी निमित्ताने नागरिक आलेले आहे.तर सरकारी नोकरी निमित्ताने अनेक नागरिक अन्य जिल्ह्यातून, राज्यातून आलेले आहेत.यासह रोहेकरांना नोकरीसाठी मुंबई,ठाणे,नवी मुंबई याह तळ कोकणात नोकरीसाठी जात असतात.

पर्यटनासाठी रोहेकरांना बाहेर जावे लागते.या सर्व बाबींचा विचार केल्यास रोहेकरांना मध्य रेल्वे व कोकण रेल्वेच्या ज्या गाड्या धावतात त्या गाड्यांचा या सर्वांना फायदा होऊ शकतो. परंतु यातील बहुतेक गाड्यांना रोहा येथे थांबा नसल्याने या नागरिकांना आपल्या इच्छित अशा ठिकाणी जाण्यासाठी पनवेल मुंबई गाठावे लागत आहे. या सर्व प्रवाशांना सुविधा मिळावा असल्यास त्यांना रोहा रेल्वे स्थानकातून जाणे सोयीचे ठरेल परंतु या सर्वांना इच्छित प्रवास करण्यासाठी रोहा रेल्वे स्थानकात जलद गाडयांना थांबा आवश्यक आहे.

सध्या जात असलेल्या काही गाड्यांना रोहा रेल्वे स्थानकात टेक्निकल थांबा आहे.परंतु प्रवासी थांबा नसल्याने ज्या गाड्यांना टेक्निकल थांबा आहे. त्या गाड्यांना प्रवासी थांबा देणे आवश्यक आहे. दुसरीकडे दिवा सावंतवाडी व दिवा रत्नागिरी या गाड्या निडी येथे थांबत नसल्याने मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे नोकरी निमित्ताने रोज जाणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यांना रोहा येथे स्थानकात येण्यासाठी तीन किलोमीटर अंतर रोज सकाळी विविध वाहनाने गाडी मिळवण्यासाठी कापावे लागत आहे. तर दुसरीकडे मेढा, भातसई, शेणवई, सानेगाव, यशवंतखार, परिसरातील गावांना रोहा र`ल्वे स्थानकात येण्यासाठी जास्त अंतर कापावे लागत आहे. या गाड्या निडी येथे थांबणे आवश्यक आहे. या पाठपुरावांच्या माध्यमातून रेल्वेकडुन रोह्यातून एक नवी गाडी चालू करण्यात आली आहे.




**महासंघाचा रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरूच**

कोरोना नंतर पॅसेंजर गाड्यांना लावण्यात आलेल्या जलद गाड्यांचे तिकीट कमी करून पुन्हा पॅसेंजर गाडीचे तिकीट लावण्यात आले आहे. परंतु रोहा दिवा गाडीला मात्र जलद गाडीचे तिकीट कायम आहे. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ रोहा रायगड सातत्याने रेल्वेकडे विविध मागण्यासाठी पाठपुरावा केला आहे. या पाठपुरावांच्या माध्यमातून रेल्वेकडून रोह्यातून एक नवी गाडी चालू करण्यात आली आहे. अन्य मागण्यासाठी सातत्याने रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा चालू आहे. रोहेकरांच्या जलद गाड्या बाबत व पॅसेंजर तिकीट बाबत ज्या मागण्या आहेत त्या रेल्वेने मान्य केल्यास रोहेकरांसाठी फायदेशीर ठरतील.

**“आमची सातत्याने मागणी असलेल्या जलद गाड्यांना अद्याप रोहा रेल्वे स्थानकात थांबा मिळाला नाही. यासह पॅसेंजर गाडीचे तिकीट दर कमी करावे ही आमची प्रमुख मागणी आहे. दिवा सावंतवाडी दिवा रत्नागिरी या गाड्यांच्या परतीसह निडी येथे थांबा मिळावा. काही जलद गाड्यांना टेक्निकल थांबा आहे. त्या गाड्यांना रोहा रेल्वे स्थानकात प्रवासी थांबा मिळावा ही प्रमुख मागणी आमची आहे. याबाबत रेल्वे बोर्डाकडे पाठपुरावा करत आहेत.**
**–सूर्यकांत वाघमारे, अध्यक्ष, महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ**

## माणगाव एसटी स्थानकातील बुक स्टॉलमध्ये घुसला साप



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव एस. टी. स्थानकातील पेपर व बुक स्टॉलमध्ये बुधवार (दि. ८) फेब्रुवारी रोजी धामण जातीचा साप शिरल्याची घटना घडली. मात्र पेपर विक्रेते सचिन उभारे यांनी प्रसंगावधान राखून सर्पमित्र सुशांत सुरेंद्र भोसले यांना तातडीने बोलावले. सर्पमित्रांनी बस स्थानकात दाखल होत आपल्या कौशल्याने धामण सापाला अलगद पकडले व नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

सुशांत सुरेंद्र भोसले सर्पमित्र यांचे एसटी स्टँडवरील प्रवाशांनी व कर्मचारी यांनी कौतुक करून आभार व्यक्त केले.

## हॉटेलचे सांडपाणी ‘पातळगंगे’त

**खालापूर : प्रतिनिधी**

सारसन गावच्या हाद्दीतून जाणाऱ्या मुंबई–पुणे एक्सप्रेस वेच्या बाजूच्या फुडमॉल हॉटेलसह इतर हॉटेल, पेट्रोल पंपातील सांडपाणी नदीत राजरोसपणे सोडले जात असल्यामुळे पाताळगंगा नदी दूषीत झाली आहे.



जलप्रदूषण थांबवून नदीपात्र साफ करून घ्यावे, अशी मागणी केली आहे. हॉटेल मालकांवर कारवाई करण्याची मागणी पत्रकार दिपक जगताप यांनी केली आहे

मुंबई – पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर टोलनाका शेजारील फुडमॉल व हॉटेल्स व्यवसायिक दुर्गधीयुक्त सांडपाणी पाताळगंगा नदी उपपात्रात सोडून जल प्रदुषण करत असल्याने या व्यवसायिकांच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे. व्यवसायिकांवर कायदेशीर कारवाई करून जलप्रदुषण थांबवून नदीपात्र साफ करून घेण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने कोणतीही कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशारा जगताप यांनी दिला आहे.

## मुरूड उसरोली, रोह्यात संत रोहिदास जयंती साजरी; समाजातील बंधू-भगिनींनी केले अभिवादन

**मुरुड : प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी संत रोहिदास महाराज यांची ६४६ वी जयंती श्री संत रोहिदास ज्ञाती पंचायत उसरोली यांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक म्हणून लक्ष्मण नागू नांदगांवकर यांची निवड करण्यात आली.

सभागृहातील भिंतीवरील असणाऱ्या संत रोहिदास यांच्या प्रतिमेस संत रोहिदास ज्ञाती पंचायतीचे अध्यक्ष प्रणय गोविंद धोंडसेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. श्री संत रोहिदास महाराज यांच्या बद्दल उमेश पेणकर, हेमंत नांदगांवकर, नारायण नांदगांवकर, नामदेव नांदगांवकर ,आत्माराम नांदगांवकर या सर्वांनी मोलाचे मार्गदर्शन केले. समाजाचे अध्यक्ष प्रणय धोंडसेकर म्हणाले की, समाजाचा जिथे फायदा होणार आहे त्यासाठी मी अहोरात्र प्रयत्न करेन. सदैव करत राहीन. मला फक्त आपल्या सर्वांची साथ हवी आहे. यावेळी शितल नांदगांवकर यांनी श्री. संत रोहिदास महाराज यांच्याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. १ ली ते १५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन खजिनदार मंगेश नांदगांवकर यांनी केले व आभार अध्यक्ष धोंडसेकर यांनी मानले.

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका चर्मकार समाजाच्यावतीने रोहा येथे संत रोहिदास जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात संत रोहिदासांच्या मौलिक विचारांची उजळणी करण्यात आली. या कार्यक्रमात संतवाणीच्या उजळणीने एक वेगळी ऊर्जा निर्मिती केली तर संतांच्या मौलिक विचारांनी उपस्थित समाजबांधवांचे प्रबोधन झाले.



रोहा तालुका चर्मकार समाजातर्फे संत रोहिदास जयंतीउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर चर्मकार समाजाचे जिल्हा सरचिटणीस राकेश केळकर, रोहा तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, जिल्हा उपाध्यक्ष दिपक आंबडकर, दिलीप पाबरेकर, रोहा तालुकाध्यक्ष समीर नागोठकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची प्रतिमापूजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाले. यावेळी प्रमुख वक्ते राकेश केळकर, राजेंद्र जाधव यांनी संताचे विचार मांडले, संतवाणीसह विविध विषयांवरील व्याख्यानाने त्यांनी उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन केले.

समाजाचे रोहा तालुका सरचिटणीस गणेश चांदोरकर यांनी सूत्रसंचालन केले तर सहचिटणीस राजन बिरवाडकर यांनी आभार मानले. यावेळी समाजातिल विद्यार्थ्यांचे गुणगौरव तसेच विशेष सन्मान, महिला मंडळाचे कार्यक्रम पार पडले.

## कळंब–पाषाणे रस्ता कामाचा झाला शुभारंभ



**कर्जत : प्रतिनिधी**

कळंब–पाषाणे रस्त्याच्या पहिल्या टप्प्याच्या कामाचा शुभारंभ आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आला. १० किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर असून त्यातील पहिल्या टप्प्यातील तीन कोटी ८० लाख रुपये निधीमधील कामासाठी आले आहेत.

पाषाणे येथे रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आणि पाषाणे नळपाणी योजनेचे भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार थोरवे यांच्यासह कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती राहुल विशे, शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा संघटक शिवराम बदे, कळंब विभागप्रमुख भरत हाबळे, रामचंद्र बदे, दिपक कुडके, उत्तम शेळके, पाषाणे ग्रामपंचायतीचे सरपंच गोटिराम वाघ, सार्वजनिक बांधकाम विभाग कर्जतचे कनिष्ठ अभियंता दिनेश चौधरी आदी उपस्थित होते.


पाषाणे ते कळंब या १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात ३. ८० कोटी रुपयांच्या मजबुतीकरण आणि डांबरीकरण कामाचा झाला. पाषाणे गावासाठी मंजूर झालेल्या जलजीवन मिशनमधील १४ कोटी रुपये खर्चाच्या नळपाणी योजनेचे भूमिपूजन देखील यावेळी करण्यात आले.

## मंगळसूत्र खेचून पळणाऱ्या चोराच्या खोपोली पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**खालापूर : प्रतिनिधी**

काटरंग येथील एच.एम.सुपर मार्केटच्या समोर चालणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोराला लक्ष्मीनगर परिसरात जिगरबाज पोलीस हवालदार प्रविण भालेराव यांनी थरारक पाठलाग करून मुसक्या आवळल्याने खोपोली पोलिसांचे कौतुक होत आहे.

सोनम निकेत देशमुख या कारमेल स्कूल, भानवज गावच्या समोरील रस्त्यावरून नातेवाईकांसोबत चालत असताना सतीश नामदेव कळंबेकर सराईत आरोपीने मोटारसायकलवरून एक सोन्याचा मुलामा दिलेले जबरदस्तीचे खेचून जबरी चोरी करून मोटार सायकलवर वेगाने निघून गेला. यामध्ये त्यांना व सोबतच्या साक्षीदार यांना ढकलून दिल्याने दुखापत झाली. त्याच आरोपीने मोटार सायकलवर पुढे जात मौजे काटरंग येथील एच. एम. सुपरमार्केटच्या समोर रस्त्यावर



शतपावली करीत असणाऱ्या गंगा यादव गौडा, यांच्या देखील गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करून पळून गेला. परंतू यादव गौडा यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र पकडून ठेवल्याने यामध्ये चोरास यश आले नाही.

याबाबत दोन्ही महिलांच्या नातेवाईकांनी तातडीने खोपोली पोलीस ठाणे येथे फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी त्वरीत पोलीस ठाण्याकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना रवाना करून शहरातील सर्व एक्झीट पॉईंटवर नाकाबंदी सुरू केली. पिडीत दोन्ही महिलांना घडलेल्या प्रकाराबाबत तक्रार दाखल करण्याकरिता पोलीस ठाण्यात येण्यास सुचविले. याच दरम्यान खोपोली शहरातील लक्ष्मीनगर येथील शक्ती सोसायटीच्या समोरच्या रस्त्यावर एक संशयीत मोटार सायकलस्वार चेहऱ्याला मास्क घालून रात्रीच्या वेळी संशयास्पद फिरत असल्याची माहिती गौरव शिंदे यांच्याकडून मिळताच घटनास्थळी हवालदार प्रविण भालेराव व इतर लक्ष्मीनगर येथील शक्ती सोसायटीसमोर पोहोचले. संशयीत मोटार सायकलस्वारास पोलिसांचा संशय आल्याने तो देखील तेथून त्याच्या मोटार सायकलवरून पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतू पोलिसांनी त्याचा थरारक पाठलाग करून संशयितास मोटार सायकलसह ताब्यात घेतले

**पनवेल महानगरपालिका**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**जाहीर सूचना**

दिव्यांग कल्याण विभागा अंतर्गत सन २०२२–२०२३ या वर्षात पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग लाभार्थांचे नवीन नोंदणी करणे करिताचे फॉर्म दिव्यांग विभागात उपलब्ध आहेत. सन २०२२–२३ या वर्षात नोंदणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१/०३/२०२३ अखेर पर्यंत असेल मुदतीनंतर आलेले अर्ज पुढील वर्षात २०२३–२४ या आर्थिक वर्षामध्ये स्विकारले जातील.

तसेच सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या नोंदणीकृत दिव्यांग बांधवांनी हयातीचे दाखले दिनांक ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत दिव्यांग विभागात सादर करावे. हयातीचे दाखले प्राप्त न झाल्यास त्यांना निधी वाटप करता येणार नाही.

सही/–
**संग्राम व्होरकाटे**
सहा. आयुक्त
पनवेल महानगरपालिका

दिनांक : ८/०२/२०२३
जा.क्र. पमपा/दिकवि/१७/२०२३

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.मनोहर लक्ष्मण ओवळेकर वय – सज्ञान व्यवसाय – बांधकाम व्यावसायिक रा. : मु. तरघर, पो.उलवे.ता.पनवेल. जि.रायगड यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक १) श्री.धर्मा रामदास पाटील.२) श्री.जनार्दन बाबु पाटील व ३) श्री.पदमाकर धर्मा पाटील.सर्व– सज्ञान राहणार : मौर्जे पाटणोली, ता.पनवेल.जि. रायगड यांच्या संयुक्त मालकीची ''मौर्जे पाटणोली, तलाठी सजा मोसारे, ता.पनवेल.जि. रायगड येथे सर्व्हे / गट नं.१२, हिस्सा नं.१, एकुण क्षेत्र ०–७८–९०'' इतकी जमीन आहे. सदर जमिनीपैकी श्री.धर्मा रामदास पाटील यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०–३८–९० इतकी जमीन आहे. श्री.धर्मा रामदास पाटील यांच्या हिश्श्याच्या एकुण जमिनीपैकी ते (क्षेत्र ०–१८–९०) इतक्या जमिनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार माझ्या अशिलांसोबत करत आहेत.सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहेत.

**जमीन (मिळकतीचे) वर्णन**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | ठिकाण | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | १२/१ | मौर्जे पाटणोली, तलाठी सजा मोसारे. ता.पनवेल.जि. रायगड | ०–७८–९० पैकी श्री.धर्मा रामदास पाटील यांच्या हिश्श्याची ०–३८–९० इतकी जमीन आहे. त्यापैकी ते ०–१८–९० इतके क्षेत्र विकत आहेत. | १६=४४<br>८=११ |

**या वर्णनाची जमीन** माझे अशिल **''खरेदी विक्रीच्या करारनाम्यानुसार''** कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत.तरीही याबाबत कोणाही व्यक्ती व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीच्या खरेदी विक्री बाबतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**श्री. निरंत वासुदेव पाटील**
**(ॲडव्होकेट)**


**कार्यालय** : तळमजला.प्लॉट नं.बी. ४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव, नवी मुंबई ७०६. फो.नं.९३२४५६९८०६.

## आदिवासी शेतकऱ्यांचा वहिवाटीचा रस्ता अडवला

### ■ गोदरेज कंपनीविरोधात शेतकरी करणार आंदोलन

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरातील तांबाटी येथे असलेल्या गोदरेज कंपनीच्या आवारात शेतकरी अडीच एकर शेती असून शेतीमध्ये जाण्यासाठी गोदरेजचे व्यवस्थापन रस्ता देत नसल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे. या प्रकरणी न्याय मिळावा अशी मागणी शेतकऱ्याने केली असून गोदरेज कंपनी व्यवस्थापनाच्या आडमुठ्या आणि दडपशाही विरोधात स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. कंपनी व्यवस्थापनाने ८ दिवसांत तोडगा काढण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण न केल्याने शेतकरी कुटुंबाने खालापूर तहसीलदारांना निवेदन देत आम्हाला शेतीमध्ये जाण्याचा रस्ता द्या अन्यथा संपूर्ण कुटुंबासह उपोषण करणार असा इशारा दिला आहे



गोदरेज कंपनीच्या आवारात संतोष हिरामण मंगाळ आणि अन्य शेतकऱ्यांची शेती आहे. गोदरेजने कंपाऊंड केल्याने शेतकऱ्यांचा वहिवाटीचा रस्ता बंद झाला आहे. शेतात जाण्यासाठी कोणताही अन्य रस्ता नसल्याने वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मात्र गोदरेज व्यवस्थापन दडपशाही करत असल्याने संतापाचे वातावरण आहे. आदिवासी शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रारही केली होती. दरम्यान स्नेहल गायकवाड, सारिका लाड, अनिता चव्हाण, सरिता मेंगाळ, यांनी कंपनीच्या प्रवेशद्वारावर जाऊन या कंपनीच्या आवारात असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी खालापूर तहसील कार्यालयाचे कर्मचारी मंडळ अधिकारी कामत यांच्यासह प्रवेश केला. याबाबत वावोशी मंडळ अधिकारी तुषार कामत यांच्याशी संपर्क साधला असता होवू शकला नाही.

**उरण नगरपरिषद, उरण**
**जाहीर निविदा सूचना–२०२३**

मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण, यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार/पुरवठादारकडून दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद दरपत्रक मागविणेत येत आहे.

**कामाचा विषय :** स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत उरण नगरपरिषद हद्दीतील रस्त्यालगत भिंतीना रंगरंगोटी व भित्तीचित्रे काढणेकामी ठेकेदार नियुत करणेबाबत.

**इसारा रक्कम :** ३०००/– रुपये. **निविदा फॉर्म फी.** १०००/– रुपये. **कामाचा कालावधी –** कार्यादेश दिल्यापासुन १५ दिवस.

**निविदा प्रसिध्द दिनांक–** ०९/०२/२०२३ **निविदा सादर करणेची मुदत** दिनांक ०९/०२/२०२३ ते दिनांक १७/०२/२०२३ पर्यंत.

**निविदा उघडणेचा दिनांक– दिनांक २०/०२/२०२३** रोजी अथवा नगरपरिषदेच्या प्रशासकीय सोईनुसार.

**आवश्यक कागदपत्र –** १) आयकर विवरणपत्र, २) अनुभवाचा दाखला, ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅनकार्ड ५) फॉर्म फी भरल्याची पावती ६) इसारा रक्कम भरल्याची पावती.

**सुचना–** १) निविदा फॉर्म मध्ये नमुद दरापेक्षा जादा दराची निविदा स्विकारली जाणार नाही. २) सदर निविदेबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल. ३) निविदा फॉर्म उरण नगरपरिषद भांडार विभागात फॉर्म फी भरल्यानंतर मिळेल.

**सही/–**
**(श्री. राहुल इंगळे)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण.

जा.क्र. /उनप/भांडार/२०२२–२३/३५१८
दि. ०८/०२/२०२३

# सिडकोकडून प्रवाशांच्या समस्यांचा आढावा

## नेरूळ व कोपरखैरण रेल्वेस्थानकाला उपाध्यक्षांची अचानक भेट

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी नवी मुंबईतील नेरूळ आणि कोपरखैरणे स्थानकांना सकाळच्या ऐन गर्दीच्या वेळी अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. संजय मुखर्जी यांनी प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेऊन प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल नाराजी व्यक्त केली. याचबरोबर संबंधित अभियंते व कंत्राटदारांना या समस्यांचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश दिले.




सिडकोने रेल्वेच्या सहकार्याने नवी मुंबईमध्ये उपनगरीय रेल्वेचे जाळे निर्माण केले आहे. प्रवाशांचा लोकल प्रवास रेल्वे स्थानकावरून सुखकर व सुरक्षित सुरू व्हावा यासाठी सिडको नेहमीच प्रयत्नशील असते. याच अनुषंगाने सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी नेरूळ व कोपरखैरण रेल्वेस्थानकाला आकस्मिक भेट दिली.

या आकस्मिक भेटी दरम्यान डॉ. मुखर्जी यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी स्थानके व प्रसानधगृहांमध्ये स्वच्छता राखणे, बंद पडलेले दिवे व पंखे दुरुस्त करणे, आवश्यकतेप्रमाणे उद्वाहन/सरकते जीने बसवणे, प्रवाशांची सुरक्षा याबाबतचे निर्देश संबंधित कंत्राटदारांना दिले.

सिडकोतर्फे यापूर्वीच सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबईतील उपनगरीय रेल्वे स्थानकांमध्ये प्रवाशांना सामोरे जावे लागणाऱ्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी व या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष समितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये सहव्यवस्थापकीय संचालक यांच्या व्यतिरिक्त सिडकोतील अभियंते व अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका प्रतिनिधी (सदस्य) आणि भारतीय रेल्वेचे प्रतिनिधी (सदस्य) यांचा समावेश आहे. प्रवाशांचा लोकल प्रवास रेल्वे स्थानकावरून सुखकर व सुरक्षित सुरू व्हावा यासाठी सिडको नेहमीच कटीबद्ध असेल यात शंका नाही.

### *कार्यक्षमतेसाठी सूचना*

*नागरिकांना सुखकर प्रवासा अनुभव घेता यावा यासाठी दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासोबतच ही कामे सुरळीतपणे होण्यासाठी संघटित आणि कार्यक्षम व्यवस्थापन प्रणाली तयार करण्याच्या सूचना सिडकोचे उपाध्यक्ष डॉ. मुखर्जी यांनी अभियंत्यांना दिल्या.*

# डास निर्मुलनासाठी धूरफवारणी करा

## भाजपच्या सुजाता पाटील यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रभाग ३४ मधील नेरूळ सेक्टर ६,८,१०, सारसोळे गाव, कुकशेत गावातील गृहनिर्माण सोसायट्या, चाळी, एलआयजीमधील अंतर्गत भागात धूरफवारणी सातत्याने करण्याची मागणी महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती व प्रभाग ८५च्या भाजपच्या माजी नगरसेविका सुजाता पाटील यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनातून दिले आहे.



प्रभाग ३४ मध्ये नेरूळ सेक्टर ६,८,१० आणि सारसोळे गाव तसेच कुकशेत गाव परिसराचा समावेश होत आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रभाग ३४ मध्ये डासांचा उद्रेक वाढल्याने स्थानिक रहीवाशी तसेच सारसोळे व कुकशेतचे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. सायंकाळनंतर डासांच्या त्रासामुळे त्यांना घराची दारे-खिडक्या बंद करून बसण्याची वेळ आली आहे. डासांमुळे मलेरिया, ताप, डेंग्यू आदी साथीच्या आजारांचा उद्रेक होण्याची टांगती तलवार आहे. नेरूळ सेक्टर ६,८,१० मधील तसेच सारसोळे व कुकशेत गावातील गृहनिर्माण सोसायटीच्या अंतर्गत भागात, चाळींमध्ये, एलआयजीच्या अंतर्गत भागात डासांचा त्रास संपुष्ठात येत नाही, तोपर्यंत नियमितपणे धुरीकरण करण्यात यावे. रात्रीच्या वेळी डासांचा त्रास होत असल्याने रात्रीच्या वेळीच धुरीकरण करण्याची स्थानिक रहीवाशी व ग्रामस्थांची मागणी आहे.

समस्येचे गांभीर्य, डासांचा त्रास, साथीच्या आजाराची भीती पाहता आपण प्रभाग ३४ मध्ये धुरीकरण अभियान राबवण्याविषयी संबंधितांना देण्याची मागणी माजी नगरसेविका सुजाता सुरज पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. याच समस्येबाबत सुजाता पाटील यांनी ४ जानेवारी रोजीही महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले होते.

# स्वच्छतेकामी हजारो नागरिकांचा सहभाग; सफाई कामगारांना एक दिवसाची सुटी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहर स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या समर्पित कामाचा यथोचित सन्मान व्हावा यादृष्टीने त्यांना त्यांच्या कामापासून एक दिवसाची सुटी देत २६०० हून अधिक ऐरोलीकर नागरिकांनी स्वतः झाडू हातात घेऊन 'माझा कचरा, माझी जबाबदारी' हे घोषवाक्य सार्थ ठरविल्याचे चित्र आज ऐरोली विभाग कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी बघायला मिळाले.

या शहर स्वच्छतेच्या महामोहीमेत ऐरोली परिसर चकाचक झाला आणि समुहशक्तीचे व्यापक दर्शन घडले. याप्रसंगी ऐरोली विभाग कार्यालय क्षेत्रातील ३५४ स्वच्छता कर्मचाऱ्यांना 'स्वच्छता योद्धा' असे पदक तसेच मानाची शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या नियंत्रणाखाली झालेल्या या स्वच्छताकर्मी सन्मान उपक्रमाचे अत्यंत नेटके नियोजन घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नवी मुंबई महापालिका नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे व परिमंडळ २ चे उपआयुक्त अमरीश पटनिगीरे यांच्या मार्गदर्शनखाली, ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी महेंद्र सप्रे यांनी केले होते. या वेळी दोन्ही उपआयुक्तांसह मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे तसेच उपमुख्य स्वछता आधिकारी विनायक जुईकर यांनी उपस्थित राहून या अभिनव उपक्रमात सहभाग घेतला.




या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वच्छता अधिकारी सुभाष म्हसे, कार्यकारी अभियंता संजय पाटील, उप अभियंता श बंधू शिरोसे, संतोष शिंतोडे, अविनाश जाधव, स्वच्छता निरीक्षक सर्वश्री. नितीन महाले, विजेंद्र जाधव, नरेंद्र विचारे, निलेश पवार, मनीष सरकटे, भरत डोंगरे, गणेश राऊत तसेच अधीक्षक महेश नाईक, विष्णु शिंगणे, विकास पाटेकर यांनी योगदान दिले.

स्वच्छताकर्मींनी मानसिकदृष्टया सक्षम व्हावे व रहावे या हृष्टीने ऐरोली विभाग कार्यालयाच्या इमारतीत त्यांच्याकरिता मेडिटेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यासोबतच ऐरोली सेक्टर ६ येथील नवी मुंबई महापालिकेच्या शाळेने १०० हून अधिक विद्यार्थ्यांची स्वच्छता रॅली काढली व परिसरात स्वच्छतेविषयी जगजागृती केली. सेक्टर ५ येथील सरस्वती विद्यालयाने आणि नवी मुंबई महापालिकेच्या सेक्टर १४ येथील शाळेनेही रॅली काढून स्वच्छतेचा जागर केला. ऐरोली विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी महेंद सप्रे यांनी स्वच्छता अधिकारी सुभाष म्हसे यांच्यासह विभाग कार्यालयातील सर्व सहकारी तसेच स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक यांना एकत्र घेऊन हा उपक्रम यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले.

ऐरोली विभाग कार्यक्षेत्रातील सिनियर सिटीझन हेल्थ केअर फाऊंडेशन, जीवन विद्या मिशन, मानवता एकता संघ, विविध स्वयंसेवी संस्था, स्वच्छताप्रेमी जागरूक नागरिक, लोकप्रतिनिधी, शाळा-महाविद्यालयांचे शिक्षक व विद्यार्थी, हॉटेल्स तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांचे मालक व कर्मचारी असे विविध घटक या उपक्रमाच्या माध्यमातून एकत्र येऊन उपक्रम यशस्वीरित्या साकार झाला.

### तरुणाईची संख्या लक्षवेधी

**सकाळी ६.३० पासून ऐरोली विभागात विविध ठिकाणी स्वच्छताप्रेमी नागरिक आपापल्या परिसरातील सफाई करण्यासाठी स्वयंस्फुर्तीने रस्त्यावर उतरले आणि २६०० हून अधिक नागरिकांच्या सहभागाने ऐरोली विभागात स्वच्छतेची व्यापक चळवळच उभी राहिली. यामध्ये तरुणाईची संख्या अत्यंत लक्षवेधी होती.**

# नवी मुंबई महापालिका दुभाजकांची रुंदी वाढवणार

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे बेलापूर मार्गावर ऐरोली येथील रिलायबल चौकामध्ये अरुंद दुभाजकामुळे वाहनांचे वांरवार अपघात होत असतात. त्यातच या अरुंद चौकामुळे वाहतूक कोंडी देखील होत होती. मात्र आता अरुंद असणारे हे दुभाजक पालिकेकडून रुंद करण्यात येणार असल्याचे पालिकेच्या अंभियता सुभाष सोनवणे यांनी स्पष्ट केले असून तेथील वाहतूक कोंडी सुटणार आहे.

ठाणे बेलापूर मार्गावरील रिलायबल प्लाझा चौकाला लागून जुना चिंचपाडा, गवतेवाडी, यादवनगर, एमआयडीसी रोड या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता आहे. त्यामुळे हा चौक गजबजलेला असतो. या चौकांच्यामध्ये असणारा दुभाजक हा अरुंद असल्यामुळे वाहनांना वळण घेण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही. त्यामुळे वळण घेताना वाहने मागे-पुढे करावी लागत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते.

**रिलायबल चौकातील वाहतूक कोंडी सुटणार**

त्यातच रिलायबल प्लाझा चौक या ठिकाणी दुभाजकांच्या मधोमध पालिकेचा असणारा विद्युत पोल डीपी बॉक्स असल्यामुळे येत असल्यामुळे दुभाजक कमी करण्यासाठी अडथळा येत आहे. त्यामुळे या दुभाजकांमधील येणारा विद्युत पोल व डीपी हे ३० फुट मागे घेण्यात आल्यांनतर व सदर डिव्हायडरची लांबी कमी करण्यात आल्यास येथील वाहतूक कोंडी सुटू शकेल, असे वाहतूक विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# ६ मार्चला नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महापालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

माहे मार्च महिन्याचा लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी ६ मार्च २०२३ रोजी होणार असून निवेदनकर्त्यांनी आपला अर्ज विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये २० फेब्रुवारी २०२३पर्यंत नवी मुंबई महापालिका आयुक्तांच्या नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे अर्जाच्या वरील दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

या अर्जात नमूद तक्रार अथवा निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये -न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अथवा अपिल, सेवा विषयक -आस्थापना विषयकबाबी या बाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे अथवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, सेक्टर १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सीबीडी, बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in यावरील डाऊनलोड आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पोलीस पाल्यांच्या नोकरीसाठी आयुक्त भारंबे यांचा पुढाकार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी गेल्या महिन्यांत पोलीस कर्मचाऱ्यांचा दरबार घेतला. या वेळी ६०० कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते. या दरबारात पोलिसांच्या मुलांच्या नोकरीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

यावर तातडीने कार्यवाही करत पोलिसांच्या मुलांची माहिती १० फेब्रुवारीपर्यंत संकलीत करण्याचे निर्देश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिले. गेल्या महिन्यांत १७ जानेवारी रोजी पोलीस आयुक्तालयात पदभार घेतल्यानंतर पहिल्यांदा आयुक्त मिलिंद भारमबे यांनी वृंद परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला २० पोलीस ठाणे, वाहतुक, गुन्हे शाखेसह मंत्रालय कर्मचारी व इतर सर्व विभागातील सहाशे कर्मचारी उपस्थित होते.

या परिषदेत अनेक अडचणींचा पाढा कर्मचाऱ्यांनी आयुक्तांसमोर वाचला. त्यापैकी एक म्हणजे पोलिसांची मुले पदवी, पदविका घेऊनही नोकरी मिळत नसल्याने कुंटुंब प्रमुख म्हणून पोलीस आयुक्तांनी लक्ष घालण्याची विनंती कर्मचाऱ्यांनी केली होती. त्यानुसार पोलीस आयुक्तांनी मानव संसाधन शाखेच्या प्रमुखांना १० फेब्रुवारीपर्यंत माहिती संकलित करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर पोलीसांच्या मुलांसाठी खासबाब म्हणून नोकरीसाठी जॉबफेर आयोजित केले जाणार आहे.

# सानपाड्यातील भुयारी मार्गाचे काम त्वरित हाती घेणे गरजेचे

## ज्येष्ठ नागरिकांनी पालिका प्रशासनाला दिले निवेदन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संभाव्य जीवित हानी वाचवण्यासाठी सानपाडा येथील भुयारी मार्गाचे काम त्वरित नवी मुंबई महापालिका प्रशासनाने त्वरित चालू करावे, अशी मागणी पामबीच (सोनखार) ज्येष्ठ नागरिक सेवा समितीने केली आहे.

या पत्रात समितीने म्हटले आहे की महापालिका प्रशासनाने विलंब न करता सानपाडा सेक्टर १९ येथील केसर सॉलीटर इमारतजवळ पामबीच मार्गावर नवीन भुयारी मार्ग तयार करण्याच्या कामाची निविदा नवी मुंबई महापालिकेने ३ नोव्हेंबर २०२१ रोजी निविदा प्रसिद्ध केली. आजमितीस सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश प्रतिक्षेत असून ती पूर्ण करावे. या भुयारी मार्गाचे काम करण्यासाठी गेले पाच वर्षे भाजपचे नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, युवा नेते निशांत करसन भगत, स्थानिक माजी नगरसेविका वैजयंती दशरथ भगत व रुपाली निशांत भगत सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

सानपाडा सेक्टर १ व १३ ते २० या क्षेत्रासाठी मोराज रेसिडेन्सी समोर एकमेव प्रवेश ठिकाण आणि बाहेत जाण्याचा मार्ग आहे. तसेच सानपाडा सेक्टर २ ते १० या क्षेत्रातील नागरीकांना मुंबई व वाशीच्या दिशेने त्वरित प्रवेश करण्यासाठी मोराज सोसायटी समोरील शारदामाई नानासाहेब धर्माधिकारी चौकातच यावे लागते.

नवी मुंबई महापालिका प्रशासनाने सेक्टर १९ केसर सॉलीटर इमारतीजवळ पामबीच मार्गाखालीलीत ज्या भुयारी मार्गाच्या कामाची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ते काम त्वरित चालू करुन जीवितहानी वाचवावी, अशी मागणी पामबीच (सोनखार) ज्येष्ठ नागरिक सेवा समितीचे अध्यक्ष देवेंद्र खाडे, सचिव चंद्रकांत काळे यांनी मनपा प्रशासनास केली आहे.



### पाच वर्षांपासून मागणी

**शारदामाई नानासाहेब धर्माधिकारी चौकात सततच्या वाहतूक कोंडीमुळे अनेकवेळा सानपाडा नोडमधील रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका आणि आपत्कालीन परिस्थीतीत अग्निशमन दलाची वाहने अडकुन जीवितहानी झाली आहे. ही जीवितहानी होऊ नये, म्हणुन नवीन भुयारी मार्ग करण्याची मागणी मागील पाच वर्षांपासून होत आहे. तसेच आजमितीस चौकाचे काँक्रीटीकरणाचे काम चालू आहे. त्यामुळे दिवसभर ट्रॅफिक जाम होत आहे.**

# वीर वाजेकर कॉलेजमध्ये उद्योजकता कौशल्य विकास व अर्थसहाय्य कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर आर्ट्स सायन्स व कॉमर्स कॉलेजमध्ये प्लेसमेंट सेलच्या वतीने मंगळवारी (दि. ७) एकदिवसीय उद्योजकता कौशल्य विकास व अर्थसहाय्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ आमोद ठक्कर यांनी करून कार्यशाळेच्या उद्देशही माहित करून दिला. पाहुणे म्हणुन जिल्हा उद्योग केंद्र इन्स्पेक्टर श्री. पालकर ह्यांनी त्यांच्यामार्फत उद्योजकता प्रशिक्षण सुविधांची माहिती दिली तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगाला लागणारे भांडवल व मदत साठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

जिल्हा कौशल्य विकास अंतर्गत काम करणाऱ्या सायली सुभाने (महात्मा गांधी नॅशनल फेलो कौशल्य विकास मंत्रालय नियुक्त) यांनी केंद्र व राज्य शासनाच्या आणि विविध महामंडळाच्या कौशल्य विकास व उद्योजकतेसाठी उपलब्ध सर्व सुविधांची माहिती करून दिली. तसेच स्टार्ट अप इंडिया ह्या उपक्रमात नावीन्यपूर्ण कल्पकतेने यशस्वी उद्योजक होण्याची सखोल माहिती दिली.

रुपम शर्मा (मॅनेजर, बँक ऑफ इंडिया) यांनी उद्योजक होण्यासाठी आपल्याकडे कौशल्य आवश्यक आहे व त्यासाठी बँक आपणास पंतप्रधान योजना व मुख्यमंत्री योजना ह्यामार्फत आपणास २० ते ४० टक्के सबसिडीचे कर्ज अत्यल्प व्याजदराने उपलब्ध आहे. बँक १०० टक्के कर्जपुरवठा करेल फक्त आपण आपल्या उद्योग किंवा इतर कशासाठी योग्य कागदपत्रे व तपशीलवार माहिती सहित संपर्क करावा, असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मान प्राचार्य पी. जी. पवार ह्यांनी महाविद्यालयात कौशल्य विकासासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. तसेच आपल्या परिसरातील उद्योजकांना असलेल्या प्रचंड संधी ह्याची माहिती करून दिली व यशस्वी उद्योजक होण्यासाठी लागणार्या सर्व सुविधा महाविद्यालयातर्फे उपलब्ध केल्या जातील, असे सांगितले.

पाहुण्यांची ओळख उप-प्राचार्य डॉ. विलास महाले यांनी करून दिली सूत्रसंचालन दीक्षिता ठाकूर यांनी केले. आभार पंकज भोये यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूषण ठाकूर, डॉ. झेलम झेंडे, संतोष देसाई यांनी विशेष परिश्रम घेतले. अनिल गावंड, किशोर जोशी, अरुण म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ. श्रेया पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचन तासात प्रत्येकाने एक पुस्तक किंवा वृत्तपत्र घेऊन एक तास वाचन करायचे आपण काय वाचले त्याचे टिप्पण लिहून जमा करायचे, त्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. वाचन तासात ३२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांचे मार्गदर्शन लाभले. कमल बांगारे व जमकु चदाना या ग्रंथालय सेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# घोडेस्वारी अपघातांवर उपाययोजना हवी

## माथेरानमध्ये पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन यंत्रणेची भूमिका महत्त्वाची

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

घोडा ही माथेरानची शान म्हणून संबोधले जाते. येणारे पर्यटक घोड्यावर बसून रपेट मारण्यासाठी उत्सुक असतात. खासकरून घोडेस्वारीसाठी सुध्दा येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक असते.

पर्यटकांसाठी एक हौशी वाहन म्हणून पाहिले जाते. परंतु मागील काही वर्षांपासून घोड्यावर बसणाऱ्या पर्यटकांना अपघातांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच काहीवेळा अल्पवयीन मुले तसेच नवखे अश्वचालक ज्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण नसताना सुध्दा घोड्यावर काम करण्यास ठेवले जाते. त्यामुळे नवख्या पर्यटकांना घोडेस्वारी करताना तोल जाऊन अथवा घोड्याचे नियंत्रण सुटल्यावर अपघात होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. यामध्ये काहींना आपले प्राण गमवावे लागले आहेत.



नवख्या पर्यटकांसाठी घोडेस्वारी म्हणजे एकप्रकारे जोखमीचे प्रवासी वाहन असून डोक्यावर हेल्मेट परिधान न करता घोडेस्वारी केल्यास चुकून अपघात घडू शकतात. हल्ली पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावरून घोडे घसरून पडतात अशा घोडेवाल्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत परंतु यापूर्वी लाल मातीच्या रस्त्यावर अपघात कसे झाले, या अनेकांना त्या अपघातात मृत्यूला सामोरे जावे लागले होते.

लाखो रुपये खर्च करून उत्तम दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविले जात आहेत. आणि याच रस्त्यावरून घोडेचालक सुध्दा सुसाट वेगाने पळवतात त्यावेळी अपघात होत नाहीत. जर का हे घोडे पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यावरून घसरत असतील तर कदाचित त्या घोड्याच्या पायाच्या नालांची झीज झाल्यामुळे तो घोडा घसरला हे मान्य करावे लागणार यात शंकाच नाही. परंतु ब्लॉकचे रस्ते घोड्यासाठी अयोग्य आहेत असा आव आणला जात आहे.

शासनाने लाखो रुपये खर्च करून याठिकाणी धूळ विरहित रस्त्याला एकमेव पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ब्लॉकचे रस्ते तयार करण्यात येत आहेत. त्यामुळे घोडेवाल्यांनी सुध्दा आपल्या व्यवसायामध्ये बदल करणे गरजेचे आहे. लोखंडी नालामुळे जर का घोडे घसरत आहेत तर रबरी नालांचा उपयोग करणे आवश्यक आहे. पण असे पर्याय या व्यावसायिकांना मान्य नाहीत आम्ही कसेही वागू आणि विकास कामांना विरोध करू ही भूमिका कायम घेतल्यामुळे हे गाव या मंडळींपायी खूपच पिछाडीवर पडले आहे.

प्रवासी वाहतूक करणारे आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या घोड्याची संख्या जवळपास सहाशे पेक्षाही अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे रस्त्यावर घोड्याच्या लिदीचे थरावर थर दिसतात. यामुळे ही लिद (विष्ठा) नागरिकांच्या आणि पर्यटकांच्या आरोग्यासाठी अपायकारक आहे.

आजवर अनेकांना घोड्यावर बसून प्रवास करताना सुरक्षा कवच अस्तित्वात नाही. एका बंगले धारकाने स्वतः मोफत हेल्मेटचे वाटप केले होते परंतु त्याचा वापर या घोडेवाल्यांनी केलेला नाही. त्यामुळे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### अपघातांची मालिका

यापूर्वी सन १९९७ साली एका विदेशी महिला पर्यटकांना घोडा बेकाबू झाल्यामुळे लुईझा पॉईंटवरून पडून घोड्यासह त्या विदेशी महिलेचा मृत्यू झाला होता. सन २००० दरम्यानच्या काळात सिनेनिर्माते आचार्य यांचा घोड्यावरून पडून दुर्दैवी अंत झाला होता. २०१५मध्ये इंडिया मेह्यू ही परदेशी महिला घोडेस्वारी करताना घोड्याच्या पायाखाली येऊन मृत्यमुखी पडली होती. २०१६मध्ये नीलम सिंग या पर्यटक महिलेचा घोड्यावरून पडून मृत्यू झाला होता. २०१८ मध्ये मुंबई ग्रँटरोड येथील रशीदा रेडिओवाला या महिलेला घोड्यावरून पडून गंभीर दुखापत झाली होती. तर भिवंडी येथील अश्रफ खान या पर्यटकाला सुध्दा दस्तुरी नाका याठिकाणी अशाचप्रकारे पडून गंभीर दुखापत झाली होती. २०२३मध्ये नुकताच हनिमूनला आलेल्या मोहम्मद काशीद इम्तियाज शेख याचाही घोडा उधळल्यामुळे खाली पडून गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे.

# आयुष्यमान भारत योजनेच्या १ लाख ९० हजार लाभार्थ्यांना कार्डचे वाटप




**अलिबाग : प्रतिनिधी**

आरोग्य व कुटुंबकल्याण खात्यांतर्गत आयुष्यमान भारत वैद्यकीय विमा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत रायगड जिल्ह्यात ४ लाख ७८ हजार १५५ पात्र लाभार्थी असून, आतापर्यंत १ लाख ९० हजार ३५५ लाभार्थांना आयुष्यमान कार्डचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करून ई-कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

सर्वसामान्यांना मोठ्या आजारांचा सामना करण्यात यावा, यासाठी आयुष्मान भारत या योजनेची सुरवात करण्यात आलेली आहे. योजनेअंतर्गत १ हजार ३५४ आजारांवर उपचार खर्च सामील आहे. कार्ड मिळालेल्या लाभार्थ्यांना योजनेत अंतर्भाव असलेल्या रुग्णालयांमध्ये पाच लाखापर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढले नाही त्यांनी ऑनलाइन अर्ज करून ई कार्ड काढून घ्यावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. आरोग्य विभागाकडून या योजनेतील लाभार्थांना ऑनलाइन अर्जाद्वारे कार्डचे वाटप करण्यात येत आहेत.

आयुष्मान भारत योजनेसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीचे वय १८ वर्ष किंवा त्याहून अधिक असावे, अर्ज करणाऱ्या व्यक्तीचं नाव सामाजिक-आर्थिक जात गणना २०११ मध्ये असले पाहिजे. आता या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर तुमची पात्रता तपासावी लागेल. ाशीर.ाक्षिरू.र्सीं.ळप या वेबसाईटवर अर्ज करता येत आहे.

### असे आहे तालुकानिहाय वाटप

आयुष्मान भारत योजनेंतर्गत अलिबाग तालुक्यातील २३ हजार ४०७ पात्र लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले असून कर्जत २४ हजार ३५३, खालापूर २१ हजार ८०५, महाड १४ हजार ९३८, मुरुड ६ हजार ७१०, पनवेल २० हजार ११, पेण २२ हजार २४, रोहा १४ हजार ७३६, श्रीवर्धन ८ हजार ५५०, उरण ५ हजार ५५४, तळा २ हजार ७५२, सुधागड ५ हजार ८६५, पोलादपूर ३ हजार २६३, म्हसळा ४ हजार ५६०, माणगाव ११ हजार ८२७ लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले आहे.

# कोलाड रेल्वे फाटकाजवळील खड्डे वाहनचालकांची डोकेदुखी

**सुतारवाडी : रामप्रहर वृत्त**

कोलाड रेल्वे फाटकाजवळ असलेला दुर्लक्षित खड्डा वाहन चालकांची डोकेदुखी झाली असून या खड्ड्याकडे कोणीही लक्ष देत नसल्यामुळे अनेक लहान मोठ्या वाहन चालकांना कसरत करून मार्ग काढावा लागत असल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे.



या ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी पडलेला असून त्या खड्ड्याच्या आजूबाजूला लहान लहान खड्डे पडलेले आहेत. रेल्वे फाटकाच्या एका बाजूला खडी पाडण्याची मशीन आहे परंतु खड्डा पडलेल्या खड्ड्यात तेथील खडी टाकून खड्डा बुजविण्याचे धाडस कोणी करत नाही.

या ठिकाणाहून रो - रो साठी अवजड सामान घेऊन रेल्वेमध्ये नेण्यासाठी सातत्याने ट्रक येथून ये - जा करत असतात. त्याचप्रमाणे रात्रं-दिवस येथून दुचाकी आणि चारचाकी तसेच अवजड वाहन सातत्याने धावत असतात. अशा ठिकाणी जो खड्डा पडलेला आहे तो वाहन चालकांना तापदायक ठरला आहे.

त्याचप्रमाणे वरसगाव पेट्रोल पंपा समोर मुंबई गोवा महामार्गावर लहान मोठे अनेक खड्डे पडलेले असून या खड्ड्यांमुळे वाहनांची कधीकधी कोंडी होऊन वाहनांच्या रांगा लागत असतात.

# रोहा येथील न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोकन्यायालय

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्ष व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार ११ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन रोहा तालुका विधी सेवा समिती यांच्यामार्फत रोहा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात करण्यात आले आहे.

या लोकन्यायालयात रोहा न्यायालयातील प्रलंबित तडजोड पात्र खटले, दिवाणी दावे, वाद्पूर्व प्रकरणे, वित्तीय संस्था, बी.एस.एन.एल., ग्रामपंचायती, नगरपरिषद, बँका, वीज वितरण कंपनी यांच्याकडील वाद्पूर्व प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. संबधित सर्व नागरिकांनी आपली प्रकरणे लोकन्यायालयात ठेवून निकाली काढली तर वेळेचा व पैशांचा होणारा अपव्यय टाळता येईल. याशिवाय आपापसांतील वाद कायमस्वरूपी सामोपचाराने मिटून तात्काळ न्याय मिळेल. त्यामुळे पक्षकारांनी आपापली जास्तीत जास्त प्रकरणे लोकन्यायालयाच्या माध्यमातून निकाली काढण्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या लोकन्यायालयाचा लाभ घेऊन सहकार्य करावे असे आवाहन रोहा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश तथा रोहा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. एस. महाले यांनी केले आहे.

# लौजी येथे लैंगिक शिक्षण मार्गदर्शन

**खालापूर : प्रतिनिधी**

शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या मनातील लैंगिक प्रश्नांना व शंकांना व्यक्त होण्यासाठी व माहिती जाणून घेण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनतर्फे एक हक्काचं सहज व्यासपीठ शाळा व कॉलेजमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ केला असून २५ जानेवारीला जनता विद्यालय, लौजी येथील विद्यार्थ्यांना खोपोली येथील डॉ. सुभाष कटकदौंड व विद्यार्थिनींना डॉ.रेश्मा रणदिवे यांनी मार्गदर्शन केले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनता विद्यालय,लौजीच्या मुख्याध्यापिका डी. डी.राणे,प्रभारी पर्यवेक्षक देशमुख पी.जी., सहशिक्षिका पाटील जे. व्ही.,एस.एस. पाटील,,सहशिक्षक बुवा सी. एस., बोरसे आर.सी.,पवार एस.एस., अनिल पांढरे व शालेय स्टाफ तसेच डॉ.संगीता केजरीवाल, अनिस् खोपोली यांचे सहकार्य लाभले.

सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे,कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, महिला संघटक निलम पाटील, कार्यवाह अखिलेश पाटील, खालापूर तालुका प्रमुख तौफिक कर्जीकर, सचिन गवळी, दिप्ती कुवेस्कर,नमिरा कर्जीकर,अमर रोठे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. या सातत्यपूर्ण सुरू असणाऱ्या उपक्रमासाठी खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.



## बँक खाते ई-केवायसी करून घेण्यासाठी पेणमध्ये शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी आपले खाते ई-केवायसी करून घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार पेण तालुक्यातील प्रधानमंत्री किसान योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी या योजनेच्या लाभासाठी आपल्या लाभाचा हप्ता जमा होणारे खाते ई- केवायसी करून घेणे आवश्यक आहे.

हे खाते ई-केवायसी करण्यासाठी आधारकार्ड व मोबाईल नंबर घेऊन आधार केंद्र, ई- सुविधा केंद्र,महा ई- सेवा केंद्र,या ठिकाणी आपल्या खात्याची ई- केवायसी करून घेण्याची आहे. पेण तालुक्यातील १५५३ लाभार्थी शेतकरी आपल्या खात्याची ई- केवायसी पूर्ण करून न घेतल्यास प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा पुढील महिन्याचा हप्ता जमा होणार नाही, याची नोंद घेण्यात यावी असे आवाहन तहसिलदार पेण, स्वप्नाली डोईफोडे यांनी केले आहे.

याचबरोबर तालुका कृषी अधिकारी कार्यालयीन कृषी सहाय्यक यांनी सुध्दा याबाबत शेतकरी बांधवांना कळकळीचे आवाहन करुन लवकर ई केवायसी करुन घ्यावी असे सांगितले आहे.

# गोरगरीब जनतेची सेवा हीच खरी ईश्वरसेवा

## उद्योजक विजयशेठ मेथा यांचे प्रतिपादन : माणगावात नेत्र शिबिराला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार (दि. ८) रोजी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत वृत्तपत्र विक्रेते पितांबर मेथा यांचे हॉल जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी २४ रुग्णांची तपासणी करून १० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शिबीर हे दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.



माणगावात गेली सात ते आठ महिन्यांपासून शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजयशेठ मेथा यांच्यावतीने मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरात आतापर्यंत ५५० हून अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात.नेत्ररोग शिबिराला दर महिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ जनता घेत आहे.

माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यातील जवळपास गेल्या ८ महिन्यांतील शिबिरात ५५० हून अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली असून गोरगरीब जनतेला दृष्टी मिळून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

शिबीर आयोजित करण्यासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा यांनी आभार व्यक्त केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी विजयशेठ मेथा, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे, प्रसाद कांबळे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील, अक्षता पार्टे, अवंतिका रिकामे, नेत्रा होडबे, कल्पेश सावंत यांनी सहकार्य करीत परिश्रम घेतले. शिबिराचा सर्वांनी घ्यावा असे आवाहन मेथा परिवारातर्फे उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

# नागोठणे रोटरी क्लबच्या आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**नागोठणे : प्रतिनिधी**

आज आपण पोलीसांमुळे सुरक्षित आहोत हे सामाजिक भान ठेवून रोटरी क्लब ऑफ नागोठणे यांच्या माध्यमातून नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच नागोठणे शहर व परिसरात जेष्ठ नागरिकांसाठी पोलीस ठाण्याच्या आवारात श्री दत्त मंदिरातील सभागृहात आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



या आरोग्य शिबिराचे उद्घाटन नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरात नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच जेष्ठ नागरिकांसह सुमारे १२५ नागरिकांनी आरोग्याची तपासणी करून घेतली.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलेले पुणे येथील आयुर्वेदाचार्य प्रिस्टाईन आयुर इंडियाचे सर्वेसर्वा डॉ. प्रवीण बढे व त्यांची टीम, नागोठणे रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन मोदी, विक्रम जैन राजेंद्र पोकळे, रोटरी क्लब ऑफ रोहा अध्यक्ष सुरेंद्र निंबाळकर, स्वप्नील धनावडे, नागोठणे रोटरी क्लबचे डॉ.अभिषेक शहासने, डॉ. जी.एस. कोकणे, डॉ. रोहिदास शेळके, श्रेया कुंटे, गौतम जैन, प्रियंका पिंपळे, धीरज मोदी,डॉ अमिता मोदी यांच्यासह पोलीस बांधव उपस्थित होते.

यावेळी जर्मन तंत्रज्ञानावर आधारित असलेली मशीन द्वारा पोलीसांची व नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. जर्मन टेक्नॉलॉजी मशीनच्या सहाय्याने पूर्ण शरीर तपासणी करण्यात आली. यावेळी डायबिटीस, हार्ट अटॅक, हृदय, डोळे, हाडांची समस्या, मूळव्याध, लहान मुले, महिलांच्या आरोग्य विषयक तक्रारी, संधिवात, ॲसिडिटी, वजन कमी करणे किंवा वाढवणे, पाठ दुखणे, मणके व पोटाचे विकार आणि इतर समस्या या शिबिरात पोलीसांनी व नागरिकांनी तपासणी करून घेतल्या.

> **यापुढेही आम्ही रोटरी क्लबच्या माध्यमातून शहर व परिसरात सातत्याने वेगवेगळी आरोग्य शिबिरे घेणार आहोत**
> **-सचिन मोदी,**
> **अध्यक्ष रोटरी क्लब**

# अल्पसंख्याक निधीचा मुस्लिम समाजाने पुरेपूर फायदा घ्यावा

## काशीद येथील सभेत आमदार महेंद्र दळवी यांचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्याक समाजासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. मुरुड तालुक्यातील मुस्लिम समाजाने या निधीचा पुरेपूर फायदा घ्यावा व आपल्या परिसरातील रस्ते, मुस्लिम समाजाची दफन भूमीला वॉल कंपाऊंड घालणे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, संरक्षक भिंत बांधणे आदी स्वरूपाची कामे पूर्णकरून घ्यावीत. आपणाकडून लवकरच प्रस्ताव दाखल करा त्याचा पाठपुरावा करून निधी तातडीने देण्यास मी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.



काशीद येथे मुरुड तालुक्यातील मुस्लिम समाजाची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी आमदार महेंद्र दळवी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते.

यावेळी जिल्हा संघटिका शुभांगी करडे, मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, अल्पसंख्याक महिला तालुका संघटिका जीनत हसवारे, अल्पसंख्याक तालुक अध्यक्ष नईम फारुकी, दीपेश वाराणकर, निलेश घाटवळ, सी. एम. ठाकूर, विहूर मुस्लिम समाजाचे माजी अध्यक्ष नईम पांगारकर, मुरुड तालुका उप प्रमुख मनोज कमाने आदी मान्यवर व मुरुड तालुक्यातील विविध गावातील मुस्लिम जमातीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारत वि. ऑस्ट्रेलिया कसोटी मालिका

# आजपासून पहिली लढत

**नागपूर : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ चार कसोटी आणि तीन ट्वेन्टी-२० सामन्यांची मालिका खेळण्यासाठी भारतात दाखल झाला आहे. उभय संघांतील पहिला कसोटी सामना गुरुवार (दि. ९)पासून नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळला जाणार आहे. श्रीलंका, न्यूझीलंड यांच्याविरुद्धच्या विजयानंतर भारतीय संघ आता 'कांगारू'विरुद्ध ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात भिडेल.



भारतीय संघात ऋषभ पंत आणि श्रेयस अय्यर (पहिल्या कसोटीत) यांच्या अनुपस्थितीत श्रीकर भरत, सूर्यकुमार यादव आणि इशान किशन या खेळाडूंना संधी मिळणार आहे. सलामीच्या जागेसाठी केएल राहुल आणि शुबमन गिल यांच्यात स्पर्धा सुरू आहे. भारताकडे मधल्या फळीत तीन फिरकी गोलंदाज असू शकतात. अक्षर पटेल, रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा, हे सर्व अष्टपैलू आहेत, पण कुलदीप यादवला तिसरा फिरकीपटू म्हणून खेळवणे हादेखील एक चांगला पर्याय आहे.

दुसरीकडे चार सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन खेळण्याची शक्यता नाही. तो बोटाच्या दुखापतीशी झुंज देत आहे. त्याचबरोबर हेझलवूडची दुखापत ही पाहुण्यांसाठी मोठे नुकसान आहे, पण लान्स मॉरिस चांगला गोलंदाज आहे. स्कॉट बोलँडही चांगली कामगिरी करीत आहे.

**पहिल्या दोन सामन्यांसाठी भारताचा संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), आर अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव, जयदेव उनाडकट, सूर्यकुमार यादव.

**पहिल्या दोन सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ** : पॅट कमिन्स (कर्णधार), अॅश्टन आगर, स्कॉट बोलँड, अॅलेक्स कॅरी, कॅमेरॉन ग्रीन, पीटर हँड्सकॉम्ब, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, उस्मान ख्वाजा, मार्नस लाबुशेन, नॅथन लायन, लान्स मॉरिस, टॉड मर्फी, मॅथ्यू रेनशॉ, स्टीव्ह स्मिथ (उपकर्णधार) मिचेल स्टार्क, मिचेल स्वीपसन आणि डेव्हिड वॉर्नर.



## क्रिकेटर कामरान अकमल निवृत्त

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा यष्टिरक्षक फलंदाज कामरान अकमलने अखेर आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला आहे. तो मागील बऱ्याच काळापासून संघातून बाहेर होता.

कामरान अकमलने ९ नोव्हेंबर २००२ रोजी हरारे येथे झिम्बाब्वेविरुद्ध कसोटी पदार्पण केले, तर ऑगस्ट २०१०मध्ये लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्ध शेवटचा कसोटी सामना खेळला. निवृत्तीनंतर पीएसएल संघ पेशावर झल्मीने अकमलला संघाचा फलंदाज सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून नियुक्त केले आहे.

## राष्ट्रीय सिनियर पुमसे तायक्वांडो स्पर्धेसाठी प्रशांत घरत व मुग्धा भोसले यांची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या अधिकृत राज्यस्तरीय सिनियर तायक्वांडो पुमसे स्पर्धेत रायगड संघातून प्रशांत घरत व मुग्धा भोसले यांनी सुवर्णपदके पटकाविली. त्यांची १० ते १२ फेब्रुवारी रोजी पाँडेचरी येथील राजीव गांधी इनडोर स्टेडियममध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे.

रायगड तायक्वांडो असोसिएशनचे अध्यक्ष सदानंद निंबरे, सचिव सुभाष पाटील व खजिनदार प्रभाकर भोईर यांनी प्रशांत व मुग्धाचे अभिनंदन व कौतुक केले. हे दोघे राष्ट्रीय स्तरावरही उत्तम खेळ करून महाराष्ट्र तसेच रायगडचा नावलौकिक करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**खेलो इंडिया यूथ गेम्स**

## महाराष्ट्र महिला कबड्डी संघ फायनलमध्ये



**भोपाळ : वृत्तसंस्था**

फॉर्मात असलेल्या रेडर हरजित, यशिका पुजारी, मनीषा आणि समृद्धी यांनी अप्रतिम खेळीतून महाराष्ट्र महिला कबड्डी संघाला खेलो इंडिया यूथ गेम्सच्या फायनलचे तिकीट मिळवून दिले आहे. युवा कर्णधार निकिताच्या कुशल नेतृत्वात महाराष्ट्र महिला संघाने अंतिम फेरीचा पल्ला गाठला. महाराष्ट्र महिला संघाने बुधवारी (दि. ८) उपांत्य लढतीत हिमाचल प्रदेशवर १२ गुणांनी विजयाची नोंद केली. महाराष्ट्र संघाने ४४-३१ अशा फरकाने सेमीफायनल मध्ये एकतर्फी विजय संपादन केला.

या लक्षवेधी कामगिरीच्या बळावर महाराष्ट्र संघाला पहिल्यांदाच फायनलमध्ये प्रवेश निश्चित करता आला. मुख्य प्रशिक्षक गीता साखरे यांचे मार्गदर्शन आणि निकिताचे कुशल नेतृत्व यातून महाराष्ट्र संघ आता चॅम्पियन होण्यासाठी सज्ज झाला आहे. यासाठी महाराष्ट्राला अंतिम सामन्यात हरियाणाविरुद्ध विजय संपादन करावा लागणार आहे. ही लढत गुरुवारी (दि. ९) होणार आहे.

राष्ट्रीय खेळाडू हरजीत, यशिका आणि मनीषा यांनी आपल्या दर्जेदार कामगिरीत सातत्य ठेवत महाराष्ट्र संघाला मोठा विजय मिळवून दिला.

## पाकिस्तानच्या आसिफ आफ्रिदीवर दोन वर्षांची बंदी

**इस्लामाबा : वृत्तसंस्था**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून स्पिनर आसिफ आफ्रिदीवर बंदी घालण्यात आली आहे. भ्रष्टाचारविरोधी संहितेचा भंग केल्याप्रकरणी दोन वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. खैबर पख्तुनख्वामधील या डावखुऱ्या फिरकीपटूवर भ्रष्टाचारविरोधी संहितेचे दोनदा उल्लंघन केल्याचा आरोप आहे. त्यापैकी एकदाही त्याने फिक्सिंगसाठी संपर्क साधल्याची माहिती पीसीबीला दिली नाही.

आसिफने राष्ट्रीय टी-२० चषकातील बहुतेक सामने गमावले आहेत. आता तो दोन वर्षांपर्यंत कोणत्याही प्रकारच्या क्रिकेट स्पर्धामध्ये भाग घेऊ शकणार नाही.

## महिला प्रीमियर लीग लिलावात ४०९ खेळाडूंचा असणार समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या धर्तीवर यंदा ४ मार्च ते २६ मार्चदरम्यान मुंबईत महिला प्रीमियर लीग होणार आहे. या स्पर्धेच्या पहिल्या हंगामासाठी लिलाव कधी आणि कुठे होणार आणि लिलावासाठी किती खेळाडू निवडले गेले आहेत याची माहितीही समोर आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या सत्राच्या लिलावाबाबत मोठी घोषणा केली आहे.

बीसीसीआयने महिला प्रीमियर लीगच्या पाच फ्रँचायझींना पाठवलेल्या



मेलमध्ये स्पर्धेसाठी मुंबईतील दोन स्टेडियम वापरण्यात येणार असल्याची पुष्टी करण्यात आली. यामध्ये मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियम आणि नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियम उपलब्ध असणार आहेत. संघांना जास्त प्रवास करावा लागू नये म्हणूनच मुंबई परिसरातील दोन स्टेडियमची निवड करण्यात आली आहे.

बीसीसीआयचे सीईओ हेमांग अमीन यांनी सांगितले की, या स्पर्धेसाठी एकूण १५०० खेळाडूंनी नोंदणी केली होती. यातून एकूण ४०९ खेळाडूंची लिलावासाठी निवड करण्यात आली आहे. १३ फेब्रुवारीला होणाऱ्या या लिलावात २४६ भारतीय आणि १६३ परदेशी खेळाडूंचा लिलाव होणार आहे. यामध्ये २०२ कॅप्ड आणि १६३ अनकॅप्ड खेळाडू आहेत. एकूण ९० खेळाडू खरेदी केले जातील, ज्यामध्ये ६० भारतीय आणि ३० विदेशी खेळाडूंचा समावेश असेल. सर्व संघांच्या पथकात १७ खेळाडूंचा समावेश असेल.

दक्षिण आफ्रिकेत विश्वचषक जिंकणारे भारताचे अंडर-१९ स्टारदेखील या लिलावाचा भाग असतील. त्यात अनकॅप्ड पार्शवी चोप्रा, अर्चना देवी, तितास साधू, श्वेता सेहरावत आणि मन्नत कश्यप (सर्वांसाठी १० लाख रुपये मूळ किंमत) यांचा समावेश आहे.

मूळ किंमत ५० लाख रुपये आहे. या प्रकारात एकूण २४ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये हरमनप्रीत, शफाली, स्मृती, दीप्ती, जेमिमा, डिव्हाईन, एक्लेस्टोन, अॅशले गार्डनर, पेरी, स्क्राइव्हर, रेणुका, लॅनिंग, पूजा, डॉटिन, डॅनी व्याट, रिचा, एलिसा, जेस जोनासेन, स्नेह राणा, ब्रुट, मेघना सिंग, डार्सी, ब्राउन आणि लॉरिन फिरी यांचा समावेश आहे.

## एफ. सी. बायर्न महाराष्ट्र फुटबॉल करंडक स्पर्धेचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

जर्मनीतील एफ. सी. बायर्न म्युनिक क्लब यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार बुधवार (दि. ८)पासून राज्यात एफ. सी. बायर्न महाराष्ट्र फुटबॉल करंडक स्पर्धा सुरू झाली. जगात सर्वाधिक प्रमाणात खेळला जाणारा खेळ फुटबॉल असून राज्यात फुटबॉल खेळाचे प्रमाण वाढवून आंतरराष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू तयार होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याणमंत्री गिरीश महाजन यांनी केले.

कुपरेज येथील मैदानात मुंबई शहर अंतर्गत एफ. सी. बायर्न महाराष्ट्र फुटबॉल करंडक स्पर्धेचे उद्घाटन मंत्री महाजन यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. उद्घाटन समारंभास एफ. सी. बायर्न म्युनिक फुटबॉल क्लबचे व्यवस्थापकीय संचालक मॅक्सिमिलन हशके उपस्थित होते.




क्रीडामंत्री महाजन म्हणाले, एफ. सी. बायर्न महाराष्ट्र करंडक फुटबॉल आजपासून तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय स्पर्धा सुरू होत असून राज्यातील एक लाख विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातून २० विद्यार्थी निवडले जाणार आहेत. या खेळाडूंना एफ. सी. बायर्न क्लबच्या माध्यमातून जर्मनीत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

पारंपरिक पद्धतीने खेळाला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पदके मिळण्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. एफ. सी. बायर्न फुटबॉल क्लब म्युनिच जगातील नामांकित संस्था असून प्रशिक्षक, खेळाडू, कर्मचारी यांच्यासाठी एक मजबूत व्यासपीठ तयार करून राज्यातील फुटबॉलच्या वाढीस मदत होणार आहे.

राज्यातील २० प्रतिभावंत खेळाडू निवडीसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेळाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. आपण चांगला खेळ खेळावा आणि या २० जणांच्या यादीमध्ये आपलं नाव असावे. खेळाडूंकडून त्यांनी स्पर्धेचे घोषवाक्य 'चलो खेलो फुटबॉल' असे आहे, असेही त्यांनी सांगितले.






## तुर्कीतील भूकंपामध्ये गोलकीपरचा मृत्यू



**अंकारा : वृत्तसंस्था**

तुर्कीमध्ये भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली आहे. हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या भूकंपात तुर्कीने आपला एक फुटबॉलपटू गमावला आहे. २८ वर्षीय गोलरक्षक अहमत इयुप तुर्कस्लानचा मृत्यू झाला.

गोलरक्षक अहमत इयुप तुर्कस्लान सध्या येनी मालत्यास्पोर या क्लबकडून खेळत होता. या क्लबसोबत त्यांचा एक वर्षाचा करार होता, पण करार संपण्यापूर्वीच टर्कीच्या गोलरक्षकाचे निधन झाले.

वरिष्ठ स्तरावरील अहमत इयुप तुर्कस्लानची फुटबॉल कारकीर्द १० वर्षांची राहिली. यादरम्यान त्याने पाच क्लबसाठी ८७ सामने खेळले. गोलरक्षकाचा मृत्यूदेखील हृदय पिळवटून टाकणारा आहे, कारण वयानुसार त्याच्यामध्ये अजूनही बरेच फुटबॉल शिल्लक होते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com